१०३ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ NAVAKAL

• पुणे, मंगळवार १३ मे, २०२५ • वर्ष-४, अंक-२३५, पाने-८, किंमत : ₹ ६

• R.N.I.No-MAHMAR/2021/81075 • Vol.- 4, Issue - 235, Marathi - Daily - Pune, 13 May , 2025 Page- 8 Price- Rs. 6/-

24x7 : www.navakal.in • संपादक- रोहित रमाकांत पांडे Email-navakal.1923@gmail.com

## दहावीचा निकाल आज जाहीर होणार

**पुणे** - महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेचा निकाल उद्या दुपारी १ वाजता जाहीर होणार आहे. हा निकाल विद्यार्थ्यांना ऑनलाईन स्वरूपात पाहता येणार आहे. ही माहिती राज्य मंडळाचे सचिव देविदास कुलाळ यांनी दिली. निकाल मंडळाच्या mahahsscboard.in, mahresult.nic.in, sscresult.mkcl.org या अधिकृत वेबसाइट्स वर उपलब्ध होणार आहे. ऑनलाईन निकालानंतर विद्यार्थ्यांना अनिवार्य विषयांमध्ये गुणपडताळणी, उत्तरपत्रिकेच्या छायाप्रती आणि पुनर्मूल्यांकनासाठी १४ मे ते २८ मे २०२५ या कालावधीत ऑनलाईन अर्ज करता येणार आहे, तर पुरवणी परीक्षेसाठी १५ मे पासून अर्ज भरता येणार असल्याचे राज्य मंडळाने स्पष्ट केले आहे.

## पद्मावती देवीच्या मूर्तीसाठी जैन मंदिरात जागा ठेवा



**दिल्ली उच्च न्यायालयाने दिल्लीतील जैन सभा धर्मार्थ ट्रस्टला नूतनीकरणादरम्यान हटवण्यात आलेल्या देवी पद्मावतीच्या मूर्तीसाठी एक जागा रिकामी ठेवण्याचा अंतरिम आदेश दिला. ही मूर्ती ट्रस्टने नूतनीकरणासाठी अन्यत्र हलवली होती. पद्मावती देवीची पूजा हिंदू धर्मात केली जाते.**

■ नवी दिल्ली

### दिल्ली उच्च न्यायालयाचे आदेश

१९७८ मध्ये दिल्लीतील जैन मंदिराच्या गर्भगृहात देवी पद्मावतीची मूर्ती स्थापित करण्यात आली होती. २०१८ मध्ये मंदिराच्या नूतनीकरणाच्या उद्देशाने ही मूर्ती त्यांच्या आसनावरून मंदिरातील एका अन्य खोलीत हलवण्यात आली होती. मात्र नूतनीकरण झाल्यावर ही मूर्ती इतर मूर्तींसह तिच्या आसनावर पुनर्प्रस्थापित करण्यात आली नाही. त्याऐवजी ट्रस्टने त्या आसनावर दुसऱ्या तीर्थंकराची मूर्ती ठेवण्याचे ठरवले. देवी पद्मावतीचे भक्त असलेल्या अजय जैन यांनी यावर आक्षेप घेतला. त्यांनी जैन सभा धर्मार्थ ट्रस्ट विरोधात न्यायालयात दावा दाखल करत ही मूर्ती तिच्या मूळ जागी ठेवण्याची » पान ७ वर

# आम्ही अजूनही सज्ज! कारवाईस कधीही तयार

# एकत्र ताकद लावू! तिन्ही सैन्यदलांचा इशारा

■ नवी दिल्ली

**ऑपरेशन सिंदूर आणि त्यानंतर पाकिस्तानने केलेले हल्ले कसे परतवून लावले याची माहिती देण्यासाठी भारतीय लष्कराने आज सलग दुसऱ्या दिवशी पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत लष्कराच्या तिन्ही शाखांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी एकसुरात सांगितले की, पहलगाम हल्ल्यानंतर पाकिस्तानच्या पापाचा घडा भरला होता. त्यांना धडा शिकवणे गरजेचे होते. त्यानुसार पाकिस्तानवर आम्ही एकत्र ताकद लावून हल्ला चढवला आणि त्यांनी केलेला हल्ला तितक्याच ताकदीने परतवून लावला. आमचे सर्व लष्करी तळ, यंत्रणा आजही कार्यरत आहेत आणि गरज पडल्यास आम्ही केव्हाही कारवाईस तयार आहोत. त्यामुळे पाकिस्तानने पुन्हा आगळीक केल्यास त्याला तेवढेच जोरदार प्रत्युत्तर पुन्हा देऊ. यानंतर पंतप्रधान मोदी हे रात्री ८ वाजता देशाला संबोधित करणार, असे जाहीर झाल्याने जनतेची उत्सुकता शिगेला पोहोचली.**

**आजच्या** पत्रकार परिषदेत डायरेक्टर जनरल ऑफ मिलिटरी ऑपरेशन्स लेफ्टनंट जनरल राजीव घई, नौदलाचे व्हाईस अ‍ॅडमिरल ए. एन. प्रमोद आणि हवाई दलाचे एअर मार्शल ए. के. भारती अर्धा तास ऑपरेशन सिंदूर आणि त्यानंतर भारत-पाकिस्तानने एकमेकांवर केलेल्या हल्ल्यांची माहिती दिली. राजीव घई म्हणाले की, पहलगाम हल्ल्यात २६ भारतीयांना क्रूरतेने मारण्यात आले. त्यानंतर आम्ही पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवादी तळांना




लक्ष्य केले. यामध्ये शत्रूंचे मोठे नुकसान झाले. परंतु आमची लढाई दहशतवाद्यांशी आहे. पाकिस्तानी लष्कराशी नाही. पाकिस्तानी सैन्याने दहशतवाद्यांना साथ दिली. त्यांनी दहशतवाद्यांची लढाई आपली लढाई बनवली. त्यामुळे त्यांच्यावर हल्ला करणे गरजेचे होते. त्यात त्यांचे जे नुकसान झाले, त्यासाठी ते स्वतःच जबाबदार आहेत.

राजीव घई पुढे म्हणाले की, आंतरराष्ट्रीय सीमेपासून » पान ७ वर

### पाकिस्तानच्या विजयाचा दावा शाहीद आफ्रिदीने रॅली काढली



**भारताने** नुकत्याच पार पडलेल्या ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून पाकिस्तानचे प्रचंड नुकसान झाल्याचे तपशील आणि ठोस पुरावे काल लष्कराच्या महासंचालकांनी पत्रकार परिषदेत उघड केले. मात्र तरीही पाकिस्तानींकडून खोटे दावे करण्याची मालिका सुरूच आहे, त्यात पाकिस्तानचा माजी क्रिकेटपटू शाहीद आफ्रिदीदेखील सहभागी आहे. शाहीद आफ्रिदीने पाकिस्तानचा ऐतिहासिक विज असा दावा करत कराचीत रॅली काढली. पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतरपासूनच आफ्रिदी भारतावर टीका करत होता. भारताने ऑपरेशन सिंधूअंतर्गत पाकिस्तानला प्रत्युत्तर दिल्यानंतरही आफ्रिदीने आपली भारतविरोधी भूमिका कायम ठेवली आणि युद्धानंतर विजय साजरा करत रॅलीचे आयोजन केले. ही रॅली कराचीत काढण्यात आली होती. व्हिडिओमध्ये तो पाकिस्तानी लष्कराच्या टी-शर्टमध्ये जीपमध्ये बसलेला दिसत आहे. त्याच्यासोबत काही सहकारीही आहेत. सोशल मीडियावर या रॅलीचा व्हिडिओ व्हायरल झाला असून, भारतीय नेटिझन्सकडून आफ्रिदीवर जोरदार टीका होत आहे. एका युजरने लिहिले, कोणता इतिहास? यांचा संपूर्ण देशच वेडा आहे. भीक मागून मिळालेल्या माफीलाही इतिहास म्हणतात. दुसऱ्याने लिहिले, असे वाटत आहे की हाच पाकिस्तानचा पुढचा इम्रान खान होणार आहे.

## मुख्यमंत्री फडणवीसांच्या निवडणूक निकालाला उच्च न्यायालयात आव्हान

### १० जूनपर्यंत उत्तर सादर करण्याचे आदेश

■ नागपूर

**मुख्यमंत्री** देवेंद्र फडणवीस यांच्या २०२४ च्या विधानसभा निवडणूक निकालाला काँग्रेस नेते प्रफुल्ल गुडधे-पाटील यांनी उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. त्यांनी या याचिकेत फडणवीस यांनी विजयासाठी भ्रष्टाचार केल्याचा आरोप केला आहे. फडणवीस यांनी ही याचिका गुणवत्ताहीन असून ती फेटाळून लावण्याची विनंती न्यायालयाला केली होती. न्यायालयाने फडणवीस यांना समन्स बजावले असून, १० जूनपर्यंत उत्तर सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

प्रफुल्ल गुडधे-पाटील यांच्या याचिकेत फडणवीस यांनी निवडणुकीदरम्यान प्रक्रियात्मक त्रुटी आणि भ्रष्ट पद्धतींचा वापर केल्याचा आरोप करण्यात आला आहे. यामध्ये ईव्हीएम वापराबाबत आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण न करणे, व्हीव्हीपॅटची मोजणी न करणे याशिवाय निवडणूक आयोगाने विजयाबाबत आवश्यक नोटिफिकेशन न काढणे यांचा समावेश आहे. त्यामुळे देवेंद्र फडणवीस यांचा विजय अवैध ठरवावा, अशी मागणी करण्यात आली आहे. या प्रकरणी न्यायमूर्ती प्रवीण पाटील यांच्या न्यायपीठाने मुख्यमंत्री फडणवीस यांना समन्स बजावले असून, त्यांना १० जूनपर्यंत उत्तर सादर करण्याचे आदेश दिले आहेत. महाराष्ट्र २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत नागपूर दक्षिण-पश्चिम मतदारसंघातून भाजपा नेते देवेंद्र फडणवीस यांनी काँग्रेसचे उमेदवार प्रफुल्ल गुडधे-पाटील यांचा पराभव करून विजय मिळवला होता. या निवडणुकीत फडणवीस यांना १,२९,४०१ (५६.८८ टक्के)मते मिळाली तर गुडधे-पाटील यांना ८९,६९१ (३९.४३ टक्के)मते मिळाली होती.

## देशातील ३२ विमानतळ पुन्हा सुरळीत सुरू झाले

■ नवी दिल्ली

**भारत** आणि पाकिस्तान यांच्यादरम्यान तणावाच्या पार्श्वभूमीवर बंद करण्यात आलेले देशातील ३२ विमानतळ तणाव निवळल्यामुळे आजपासून पूर्ववत सुरू करण्यात आले.

पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याला भारतीय लष्कराने चोख प्रत्युत्तर देण्यास सुरुवात केल्याने गेल्या आठवड्यात तणाव अगदी टिपेला पोहोचला होता. त्यामुळे ९ ते १५ मे या कालावधीत राज्यातील ३२ विमानतळ बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले होते. शनिवारी उभय देशांदरम्यान युद्धविरामाची घोषणा झाल्यानंतर परिस्थिती वेगाने पूर्वपदावर येऊ लागली आहे. त्यामुळे बंद करण्यात आलेले हे विमानतळ सुरू करण्यात आले आहेत.

## विराट कोहलीची कसोटीतून निवृत्ती बीसीसीआयची विनंतीही फेटाळली

### १२३ कसोटीत ९२३० धावा ठोकल्या

■ नवी दिल्ली

**सलामीवीर** फलंदाज रोहित शर्मापाठोपाठ भारताचा सर्वात लोकप्रिय क्रिकेटपटू असलेल्या विराट कोहलीने आज कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली. त्याने दोन दिवसांपूर्वी आपला राजीनामा बीसीसीआयकडे सोपवला होता. मात्र बीसीसीआयने त्याला आपल्या निर्णयावर फेरविचार करण्यास सांगितले होते. पण बीसीसीआयच्या विनंतीनंतरही त्याने कसोटी क्रिकेटला रामराम ठोकला. त्यामुळे भारतीय कसोटी संघाला वरिष्ठ खेळाडूंची उणीव




भासणार आहे. विराट एकदिवसीय क्रिकेट खेळत राहणार आहे.

१२३ कसोटीत ९२३० धावा करणाऱ्या आणि कर्णधार म्हणून खेळताना २० शतके ठोकणाऱ्या विराट कोहलीने एक्सवर भावनिक पोस्ट केली की, गेल्या १४ वर्षांपासून भारतासाठी कसोटी क्रिकेट खेळत आहे. माझा प्रवास कुठे जाईल याची मी कधी कल्पनाच केली नव्हती. कसोटी क्रिकेटने मला घडवले आणि आयुष्यभर जपून ठेवावे असे धडे दिले. कसोटी क्रिकेट खेळण्यात काहीतरी खूप वैयक्तिक आहे. या फॉरमॅटपासून दूर जाताना मन जड आहे, पण हे योग्य वाटते. मी माझे सर्व काही दिले आणि याने मला माझ्या अपेक्षेपेक्षा खूप जास्त दिले.

» सविस्तर वृत्त पान-४ वर

## बीएसएफचा आणखी एक जवान शहीद

■ नवी दिल्ली



**जम्मूमध्ये** पाकिस्तानने सीमेपलिकडून केलेल्या गोळीबारात सीमा सुरक्षा दलाचा (बीएसएफ) आणखी एक जवान शहीद झाला. गोळीबारात गंभीररित्या जखमी झालेल्या या जवानाचा काल उपचारादरम्यान मृत्यू झाला. बीएसएफच्या वतीने काल ही माहिती देण्यात आली. दीपक चिमणगखम असे या शहीद जवानाचे नाव आहे. बीएसएफच्या सातव्या बटालियनमध्ये ते कॉन्स्टेबल होते. जम्मू जिल्ह्यात पाकने केलेल्या गोळीबारात सातव्या बटालियनचे आठ जवान जखमी झाले होते. त्यामध्ये उपनिरीक्षक महंमद इम्तेयाज यांचा जागीच मृत्यू झाला होता. तर जखमी दीपक चिमणगखम यांचा दुसऱ्या दिवशी मृत्यू झाला.

## पवार काका-पुतणे पुन्हा एकत्र पुण्यातील कार्यक्रमात उपस्थिती

■ पुणे

**महाराष्ट्र** राज्य सहकारी बँकेच्या कार्यक्रमानिमित्त राज्यातील पवार काका-पुतणे जोडी पुन्हा एकदा जाहीर कार्यक्रमात एकत्र आले. सावकारीविरुद्ध पुण्यातील सुपे या गावात १२ मे १८७५ रोजी उठाव झाला होता. त्याची दख्खनचा उठाव म्हणून इतिहासात नोंद झाली. या घटनेला दीडशे वर्षे पूर्ण झाल्यामुळे दख्खनचा उठाव शतकोत्तर सुवर्ण स्मृतिदिनाच्या निमित्ताने राज्य बँकेने या विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले. यावेळी राज्याचे मुख्यमंत्री आणि भाजपा नेते देवेंद्र फडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी उपस्थित होते. यावेळी अजित पवार यांनी काकांशी संवाद साधला.

मागील काही दिवसांपासून राष्ट्रवादी शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार आणि उपमुख्यमंत्री व राष्ट्रवादी अजित पवार गटाचे अध्यक्ष अजित पवार यांच्यातील संबंध सुधारल्याची चर्चा आहे. राष्ट्रवादीत फूट पडल्यानंतर अनेक कार्यक्रमांमध्ये पवार काका-पुतणे एकत्र आले होते. परंतु त्यावेळी अजित पवारांनी खुर्ची बदलून घेणे, शरद पवार यांच्याशी संवाद टाळणे, त्यांच्यापासून कार्यक्रमात अंतर ठेवणे असे पाहावयास मिळत होते. परंतु आजच्या कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार या » पान ७ वर

## राज्यात पुढील चार दिवस वादळी पावसाचा इशारा

■ पुणे

**राज्यातील** अनेक जिल्ह्यांमध्ये पुढील चार दिवस वादळी वाऱ्यासह पावसाचा इशारा हवामान खात्याने दिला आहे. यामध्ये विदर्भातील जवळपास सर्वच जिल्ह्यांचा समावेश आहे. यानुसार बुलडाणा, अकोला, वाशिम, यवतमाळ, अमरावती, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदीया, गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्यात ढगांच्या गडगडाटासह वादळी पाऊस पडण्याची शक्यता आहे. मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, धाराशिव, परभणी, नांदेड, हिंगोली,लातूर, मध्य महाराष्ट्रातील नाशिक, अहिल्यानगर, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर,सोलापूर, कोकणातील सिंधुदूर्ग, रत्नागिरी, रायगड, मुंबई, ठाणे, पालघर जिल्ह्यांमध्ये जोरदार पाऊस पडण्याची शक्यता वर्तवली आहे. तर खानदेशातील जळगाव, धुळे आणि नंदूरबार जिल्ह्यात उद्या काही ठिकाणी वादळी पावसाचा अंदाज आहे.

## बिहारात नितीश कुमारांचा पक्ष ९२,००० बुथ समित्या स्थापणार

■ पाटणा

**बिहार** विधानसभा निवडणुकीचे पडघम वाजू लागले असून, सत्ताधारी जनता दल संयुक्तचे प्रमुख व मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. यावेळी प्रचार करण्यासाठी जनता दल संयुक्तने भाजपाच्या पद्धतीने राज्यभरात ९२,००० बुथ समित्या गठीत करण्याचा निर्णय घेतला आहे.

बिहारमध्ये सध्या भाजपा व जनता दल संयुक्त यांचे युतीचे सरकार आहे. बिहारची सत्ता आपल्याच हातात राहण्यासाठी दोन्ही पक्षांनी तयारी केली आहे. यावेळी जास्तीत जास्त जागा निवडून आणून आपला मुख्यमंत्री बनवण्याचे स्वप्न आहे. पहलगाम हल्ला झाल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही बिहारमधीलच सभेतूनच दहशतवाद्यांवर कारवाई करण्याचे संकेत दिले होते. दुसऱ्या बाजूला मुख्यमंत्री नितीश कुमार यांनीही सत्ता आपल्या पक्षाकडे राहील, यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. पक्षाकडून राज्यातील ९२ हजार बुथवर समित्या नेमण्यात येणार आहेत. आता त्यातील केवळ ३७ हजार बुथवरील समित्या नेमण्याचे बाकी आहे.

## मुंबईतील पहिल्या केबल स्टेड पुलाचे आज उद्घाटन

■ मुंबई

**मुख्यमंत्री** देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्या मुंबईतील पहिल्या केबल स्टेड पुलाचे उद्घाटन होणार आहे. २६६ कोटी रुपये खर्च करून बांधण्यात आलेला हा पूल भायखळा पूर्वेच्या बॅ. नाथ पै मार्गावरील रेल्वे ओव्हर ब्रिज आहे. या पुलाचे बांधकाम १४ फेब्रुवारी २०२२ रोजी सुरू झाले होते. या पुलाची लांबी ३८५ मीटर असून यावर दोन खाली उतरण्यासाठीचे रॅम्पही तयार करण्यात आले आहेत. एकूण सहा लेन असलेला केबल स्टेड पद्धतीने तयार करण्यात आलेला हा मुंबईतला पहिलाच पूल आहे. या पुलाचे सुटे भाग बाहेर तयार करून त्यानंतर त्याची या ठिकाणी जुळणी करण्यात आली आहे. त्यासाठी साध्या स्टिलच्या गर्डरचा वापर करण्यात आला आहे. या पुलामुळे रे रोडवरील वाहतूक अधिक वेगाने व सुरळीत पार पडणार आहे.



## आरोपी आणि फिर्यादीचा एकच वकील! कोर्ट संतापले



■ नवी दिल्ली

**आरोपीसाठी** युक्तिवाद करणाऱ्या वकिलाने फिर्यादीचीही बाजू मांडण्यासाठी याचिका दाखल करण्याचा अजब प्रकार सर्वोच्च न्यायालयात नुकताच घडला. संबंधित वकिलांवर न्यायालय प्रचंड संतापले. बार कौन्सिलला तत्काळ कारवाईचे आदेश न्यायालयाने दिले.

तामिळनाडूमध्ये सध्या चर्चेत असलेल्या सरकारी नोकरी मिळवून देण्याच्या बदल्यात लाच घेण्यासंबंधीच्या (कॅश फॉर जॉब) खटल्यात एका वकिलाने हा कारनामा केला. या प्रकरणात तामिळनाडूचे माजी मंत्री सेंथिल बालाजी मुख्य आरोपी आहेत. त्यांच्याव्यतिरिक्त अनेक जणांना खटल्यात सहआरोपी करण्यात आले आहे. या घोटाळ्याशी संबंधित अनेक याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल झाल्या आहेत. या याचिकांवर एकत्रित सुनावणी सुरू आहे.

सुनावणीदरम्यान न्यायालयात अँटी करप्शन मुव्हमेंट नावाच्या संस्थेकडून एक याचिका दाखल झाली. विशेष न्यायालयाने घोटाळ्याप्रकरणी दिलेल्या निर्णयाला या याचिकेतून आव्हान देण्यात आले आहे. मात्र याचिकाकर्त्याची बाजू मांडणाऱ्या वकिलाचे नाव पाहून न्यायमूर्ती अभय ओक चांगलेच संतापले. कारण तोच वकील या प्रकरणात आरोपीची बाजू मांडत होता. त्यांनी भर कोर्टात संबंधित वकिलाला खडे बोल सुनावले. तसेच याचिका फेटाळून लावत तामिळनाडू बार कौन्सिलला सुब्रमण्यम यांच्यावर कारवाई करण्याचे निर्देश दिले.

## अमेरिका-चीनमध्ये करार आयात शुल्कात मोठी कपात

■ वॉशिंग्टन

**अमेरिकेने** चिनी वस्तूंवर लावलेले १४५ टक्के आयात शुल्क कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. पुढील ९० दिवसांसाठी हे शुल्क कमी करण्यात आले असून, त्यानंतर शुल्काबाबत अंतिम निर्णय घेतला जाणार आहे. काही दिवसांपूर्वी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनच्या वस्तूंवरील आयात शुल्क कमी करणार असल्याचे संकेत दिले होते.

अमेरिकेने चिनी वस्तूंवरील आयात शुल्क १४५ टक्क्यांवरून ३० टक्के केले आहे. त्याला चीननेही त्यांना सकारात्मक प्रतिसाद दिला असून, चीनमध्ये येणाऱ्या अमेरिकन वस्तूंवरील आयात शुल्क १२५ टक्क्यांवरून १० टक्क्यांवर आणले आहे. दोन्ही देशांच्या या निर्णयाचे इतरही देशांनी स्वागत केले आहे. चीन व अमेरिका यांच्यातील वाद संपल्याचे पडसाद जागतिक शेअर बाजारावर पडले असून अनेक देशांमधील शेअर बाजाराने उसळी घेतली.

# छोट्या जाहिराती

संपर्क करा ८४२२८१७४४५/८१०८११६४२३

## पाहिजेत

मुंबईसाठी पाहिजेत अनुभवी सिक्युरिटीगार्ड व सुपरवायझर पगार 20,000/- to 25,000/- संपर्क : 157, उद्योग भवन सोनावाला रोड, गोरेगाव (पूर्व), मुंबई - 400063. संपर्क - **9322662644 / 44555312** {NC250608}

सिक्युरिटी गार्ड/हाऊसकिपिंग, जेन्टस, लेडीज पाहिजेत. सायन, चुनाभट्टी, दादर, माटुंगा, मुलुंड, मिरारोड, वरळी, मरीनलाईन, गोवंडी मालाड, बांद्रा **8291056761 / 8422880513** {NC250634}

स्त्री पुरुष केअर टेकर पाहिजेत. घरकुल केअर सेंटर : **9819426634 / 9969529162** {NC250565}

जन्मलेल्या बाळासाठी अनुभवी झापा बाई मॉलिश अंघोळ घालण्यासाठी पाहिजे. **91363 83011 / 98923 60051** {NC250580}

जळगाव येथे 19x25 shinohara/ 15x20 heidelberg GTO 4 Colour ऑफसेट मशीनसाठी कुशल ऑपरेटर, फिडरमॅन आणि बॉयलर, पूर्ण टिम पाहिजे. (राहण्याची सोय) आकर्षक पगार. संपर्क : **9371029994, 9022455406** {NC250640}

क्वालिटी कामाचा अनुभवी असलेले 28x40 ऑफसेट मशीन करिता बॉलर, 25x36 हेडलबर्ग UV मशीन करिता प्रिंटर, बाईडिंग डिपार्टमेंटकरीता बाईडर भायखळा येथे पाहिजेत. चांगला पगार संपर्क - **9323874990** {NC250016}

घरकामासाठी (10/12/24 तास) बेबीकेअर / जापाबाई आणि कुकींगसाठी अनुभवी 'बायका/मुली' पाहिजेत. पगार 18,000/- ते 40,000/- रंजीतसर **9321417007 / 9892575886** दादर वेस्ट {NC250557}

दादर ऑफिसमध्ये फोन रिसीव्ह करण्यासाठी मुली अर्जंट पाहिजेत. पगार 15000-18000/- **(9920270431)** {NC250655}

## पाहिजेत

तुर्भे येथे 5 स्टार हॉटेलला वेटर / हाऊसकिपिंग मुले पाहिजेत. पगार 16700/- 8 तास + जेवण फ्री आठवड्याची सुट्टी वय 18-35. **9769575757 / 9819384344** {NC250651}

कल्याणमध्ये दवाखान्यासाठी अनुभवी हेल्दी निर्व्यसनी वार्डबॉय, आया मसाजीस्ट 12/24 तासांसाठी पाहिजेत. आकर्षक पगार + सुविधा. डॉ. थोरात **9324677010** {NC250652}

मुलुंडमध्ये अनुभवी बिनाअनुभवी केबल ट्रे फिटर, आर्क वेल्डर, एंगल ड्रिलर, हेल्पर पगार - 15000 ते 20000/- आणि अकाउंट्स मुलगी (Tally/Eway/ GST), पाहिजेत. (घाटकोपर - कल्याण राहणाऱ्याला प्राधान्य ) एशियन टेलिकॉम- मुलुंड . WhatsApp on **9821043690** {NC250649}

घरकामासाठी महिला / मुली / मुले (भरपूर पगार) राहण्याची - खाण्याची सोय) **9820234040** ( ठाणे) {NC250650}

ऑफिस कामासाठी महिला कर्मचारी हवे, पगार 12000 दादर मोबाइल : **8291044924** {NC250653}

दादर, माहिम, माटुंगा परिसरात सिक्युरिटीगार्डस पाहिजेत. (8 तास) वेळेवर पगार **7977031405 / 9930616001** {NC250654}

बॅक ऑफिससाठी मुले मुलींची भर्ती पगार 16500-35500 संपर्क **8149378779** {NC250656}

## Situation Vacant

REQUIRED MARKETING / TELEMARKETING EXECUTIVE, FILD STAFF (SALARY RS. 15000 + INCENTIVE) TRACKON COURIER PVT. LTD. 275 SHAHID BHAGAT SINGH ROAD, 16 TULSI TERRACE, FORT. {NC250607}

## Educational

GOVERNMENT RECOGNISED DMLT, ADMLT COURSES, DAMYANTI INSTITUTE (SINCE 1989) BHAYANDAR - THANE - DADAR - ANDHERI - KALYAN **7738619119 / 9004944413 / 9082884290** {NC250541}

## शैक्षणिक

हमखास पासाची गॅरंटी खर्डीकर क्लासेस. ७वी नापास? डायरेक्ट १०वी. ११वी नापास? डायरेक्ट १२वी. डोंबिवली: **9820627580 / 9820904646** {NC250320}

## व्यवसाय विषयक

घरबसल्या ड्रोण पेपरडिश बनवा. महिना 30 - 35 हजार कमवा दोन वर्षाचे अॅग्रीमेंट - **9028160157** {NC250636}

दिवसा 3000/- कमवा. स्वतः चा उद्योग सुरू करा. अनिरुद्धा दादर - **8652643434** विरार **8010097086** {NC250618}

## कर्जविषयक

आधारकार्ड आणि पॅनकार्डवर गॅरेंटेड कर्ज मिळेल लवकरात लवकर. संपर्कः **8108192662** {NC250596}

## गुंतवणूक विषयक

गुंतवणुक गारमेंट व्यवसायात गुंतवणुक करून दरमहा 50,000/- नफा मिळवा. Limited period offer संपर्क - **9892073272** {NC250657}

## CHANGE OF NAME

I, **Indrasen Singh** Residing B-202 Tulsi Aangan Plot No. 30, Sector 21, Ulwe Wahal Dist Raigarh - 410206 Changed My Name to **Indrasen Rammurrat Singh** as per Maharashtra State Government Gazette No. (M-2543408) dtd. May 8-14, 2025.

**Indrasen Singh**
(Signature by old name)


**गिर्यारोहकांचा मृत्यू आणि वाढता कचरा कमी करण्यासाठी नेपाळ सरकार आता माउंट एव्हरेस्टसाठी नवीन कायदा आणत आहे. नव्या बदलानुसार भविष्यात अनुभवी गिर्यारोहकांनाच एव्हरेस्टवर चढाई करण्याची परवानगी दिली जाणार आहे. माउंट एव्हरेस्ट सर करताना आतापर्यंत ३०० पेक्षा अधिक गिर्यारोहकांचा मृत्यू झाला आहे. एव्हरेस्टवर सातत्याने घटना घडत असतानाही दरवर्षी शेकडो गिर्यारोहक सीमा ओलांडून ८८४९ मीटर उंचीचे शिखर सर करण्यासाठी नेपाळला येतात. नेपाळच्या प्रस्तावित नव्या कायद्यानुसार आगामी काळात एव्हरेस्टवर चढाई करण्यासाठी परवानगी देताना संबंधित गिर्यारोहकाने यापूर्वी किमान ७ हजार फूट उंचीचे शिखर सर केलेले असणे गरजेचे आहे आणि त्याचा पुरावा देखील द्यावा लागणार आहे. त्याचवेळी या अभियानाचे नेतृत्व करणारा नेपाळी नागरिक असणे बंधनकारक करण्यात आले आहे.**

# एव्हरेस्टस्वारी अधिक आव्हानात्मक

■ कमलेश गिरी

माउंट एव्हरेस्ट सर करताना आतापर्यंत ३०० पेक्षा अधिक गिर्यारोहकांचा मृत्यू झाला आहे. एव्हरेस्टवर सातत्याने घटना घडत असतानाही दरवर्षी शेकडो गिर्यारोहक सीमा ओलांडून ८८४९ मीटर उंचीचे शिखर सर करण्यासाठी नेपाळला येतात. गेल्या दोन तीन वर्षांत एव्हरेस्टवर चढाई करणाऱ्यांची रांग लागली. २०२३ मध्ये एव्हरेस्टवर कोंडी झाल्याने १२ गिर्यारोहकांचा मृत्यू झाला. २०२४ मध्ये आठ जणांचा मृत्यू झाला.

नेपाळ आता एव्हरेस्टवरील मृत्यूंची संख्या कमी करण्यासाठी नवीन पावले टाकण्याचा प्रयत्न करत आहे. प्रस्तावित नव्या कायद्यानुसार आगामी काळात एव्हरेस्टवर चढाई करण्यासाठी परवानगी देताना संबंधित गिर्यारोहकाने यापूर्वी किमान ७ हजार फूट उंचीचे शिखर सर केलेले असणे गरजेचे आहे आणि त्याचा पुरावा देखील द्यावा लागणार आहे. त्याचवेळी या अभियानाचे नेतृत्व करणारा नेपाळी नागरिक असावा, असे बंधन आहे. प्रस्तावित विधेयक संसदेच्या वरिष्ठ सभागृहात मांडण्यात आले असून ते मंजूर होईल, असे मानले जात आहे. नेपाळची अर्थव्यवस्था प्रामुख्याने गिर्यारोहण, ट्रेकिंग अणि पर्यटनावर अवलंबून आहे. दरवर्षी लाखो पर्यटक नेपाळला येतात. एव्हरेस्टवर चढाई करण्याचा खर्च किमान तीस हजार ते एक लाख अमेरिकी डॉलर एवढा राहतो. पैसे कमाविण्याच्या नादात नवशिक्या लोकांनाही एव्हरेस्टची परवानगी दिली जात असल्याने तीव्र प्रतिक्रिया उमटत होत्या.

### 'डेथ झोन' काय आहे?

गिर्यारोहणात ८ हजार मीटरपेक्षा अधिक उंचीवर जाण्याचा अर्थ डेथ झोनमध्ये दाखल होणे. डेथ झोनमध्ये कडाक्याची थंडी असतेच शिवाय ऑक्सिजनचे प्रमाण एक तृतियांशने कमी होते. ऑक्सिजन घेण्यासाठी डेथ झोनमध्ये तीनवेळा श्वास घ्यावा लागतो. कमी ऑक्सिजनमुळे मेंदू काम करत नाही. शरीराच्या प्रत्येक भागात ऑक्सिजन पोचवण्यासाठी हृदयाला वेगाने काम करावे लागते. उंचावर असताना झटके येणे, उलटी येणे, बेशुद्ध पडणे, संतुलन बिघडणे यासारख्या अडचणी येऊ लागतात. शिवाय हृदयविकाराचा झटका, ब्रेन हॅमरेज आणि फुफ्फुसात पाणी भरण्याची जोखीम देखील अनेक पटीने वाढते. डेथ झोनमध्ये ऑक्सिजन सिलिंडर संपण्याचा अर्थ म्हणजे या आधारावर गिर्यारोहन करणाऱ्या व्यक्तीने तातडीने उतरणे. अन्यथा दर मिनिटाला त्याच्या शरीरातील पेशी



मृत होऊ लागतात. अशावेळी कमी अनुभवी असलेल्या गिर्यारोहकाचा मृत्यू होण्याची शक्यता राहते.

### कसे असतात डेथ झोन?

जगभरातील पर्वतांतील सर्वच्या सर्व चौदा डेथ झोन हिमालय आणि काराकोरम पर्वतसाखळीत आहेत. या डेथ झोनवर ठिकठिकाणी गिर्यारोहकांचे मृतदेह विखुरलेल्या अवस्थेत पडलेले दिसतात. कारण एवढ्या उंचीवरून आणि धोकादायक उतारावरून ते मृतदेह खाली आणणे देखील स्वत:चा जीव धोक्यात घालण्यासारखे आहे. बहुतांश गिर्यारोहकांना या गोष्टीची कल्पना असते. त्यांचा मृत्यू झाला तर त्यांचा मृतदेह शिखरावरच पडून राहिल, याची जाणीव असते. हा एकप्रकारे शिखराशी झालेला अलिखित करार असल्याचेही गिर्यारोहक म्हणतात.

### नव्या नियमांवर आक्षेप

गियारोहणाची मोहीम आखणाऱ्या संस्था, गिर्यारोहक हे नेपाळ सरकारच्या नव्या योजनेने त्रस्त झाले आहेत. ॲडव्हेंचर्सच्या मते, कोणत्याही ठिकाणी सात हजार मीटर उंचीची केलेली चढाई नेपाळ सरकारने मान्य करायला हवी. या शिखरावर मार्गदर्शन करणारे माउंटेन गाइड्स हे इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ माउंटेन गाईडसने पात्र ठरविलेले असणे आवश्यक आहे. पण यासाठी राष्ट्रीयत्वाचे बंधन चुकीचे राहू शकते. अमेरिकेच्या मेडिसन माउंटनिअरिंगचे गॅरेट मॅडिसन म्हणतात, नेपाळ सरकाने उंचीची मर्यादा ६५०० मीटर करायला हवी. कारण या ठिकाणी सात हजार मीटरपेक्षा अधिक उंचीवरचे सुस्थितीतील शिखर शोधणे कठीण आहे.

### पैशाचे आमिष

जगभरातील सर्वात उंचीच्या चौदा शिखरांपैकी आठ शिखर नेपाळच्या एव्हरेस्टरवर आहे. परंतु अनुभवहिन लोकांना पर्वतरोहणाची परवानगी दिली जात असल्याने नेपाळला बऱ्याचअंशी टीकेचा सामना करावा लागला. २०२३ मध्ये देशाने ४७८ परवाने दिले. किमान बारा गिर्यारोहकांचा मृत्यू झाला आणि पाच जण बेपत्ता झाले. २०२२ मध्ये आठ गिर्यारोहकांचा मृत्यू झाला. यापैकी अनेक जणांचा मृत्यू हा डेथ झोनच्या परिसरात झाला. तेथे ऑक्सिजनचे कमी प्रमाण आणि गिर्यारोहकांची गर्दी हे चित्र पाहवयास मिळते.

### नवीन नियम

नव्या नियमानुसार अर्ज करताना गिर्यारोहकांनी नेपाळमधील सात हजार मीटर उंचीचे शिखर सर केलेल्याचा पुरावा सादर करावा लागणार आहे. मोहिमेचा प्रमुखही नेपाळी नागरिक असणे आवश्यक आहे. शिवाय मागच्या महिन्यातील आरोग्य प्रमाणपत्रही सादर करावे लागणार आहे. यासंदर्भात कागदपत्रांची जुळवाजुळव केली जात असेल तर तसे गिर्यारोहकांना जाहीर करावे लागेल. आपला परवाना दुसऱ्यांना देता येणार नाही. एखाद्या नैसर्गिक आपत्तीमुळे किंवा अन्य कारणांमुळे मोहीम बारगळली तर संबंधित परवाना दोन वर्षापर्यंत लागू राहिल. मात्र तो परत करता येणार नाही. परवाना शुल्कात ३६ टक्के वाढ केली असून तो ८२४९ पौंडांवरून ११,२४८ पौंड करण्यात आला आहे. म्हणजे १२,८ लाख रुपये. गेल्या दहा वर्षात प्रथमच परवाना शुल्कात वाढ करण्यात आली आहे.

आता २०२५ चा हंगाम सुरू झाला आहे आणि नेपाळने आतापर्यंत ४०२ जणांना परवाने दिले आहेत. मे महिन्यांत ही संख्या ५०० पेक्षा अधिक होऊ शकते. नेपाळ हा एव्हरेस्टच्या मोहिमेला परकी चलनाचा मोठा स्रोत म्हणून पाहतो. परदेशातील गिर्यारोहक हे स्थानिक रसद, पोर्टर, शेर्पा आणि गिअरवर हजारो डॉलर खर्च करतात. त्याचवेळी शिखरमार्गावर गिर्यारोहकांची गर्दी, एव्हरेस्टवर कचरा, पर्यावरण हानी यासारख्या गोष्टींचे प्रमाण वाढले आहे. नवीन नियमांचा उद्देश हा अनुभवी गिर्यारोहकांना एव्हरेस्टवर चढाई करण्याची मुभा देत असताना अन्य दुष्परिणाम कमी करण्याचा आहे. या माध्यमातून जोखमीच्या आणि महागाच्या बचाव मोहिमांची आवश्यकता कमी राहिल.

# आजचे राशी भविष्य

मंगळवार दि. १३ मे २०२५

ज्योतिष पंडीत अर्चना तारू

| | |
|---|---|
| मेष | तुम्ही केलेल्या योजना राबवण्यामध्ये अडचणी निर्माण होतील. आर्थिक नुकसानीची शक्यता. घरात विनाकारण वाद नको. |
| वृषभ | भागीदारी व्यवसायात आर्थिक लाभ मिळतील. घरासंबंधीची कामे मार्गी लागतील. विवाहाचे प्रस्ताव येतील. |
| मिथुन | नोकरीमध्ये विरोधकांवर मात करण्यात यश मिळेल. व्यवसायात सहकारी वर्गाची साथ लाभेल. आर्थिक लाभाचे प्रमाण चांगले राहील. |
| कर्क | एकाच वेळी अनेक कामे पार पाडाल. स्पर्धा परीक्षा देणाऱ्यांसाठी अनुकूल काळ. तरुणांना प्रेमात पूरक प्रतिसाद मिळेल. |
| सिंह | कुटुंबीयांचे सहकार्य राहील. नोकरीच्या प्रयत्नांना यश मिळेल. दूरचा प्रवास करताना अचानक अडचणी येऊ शकतात. |
| कन्या | कार्यक्षेत्रात नवनवीन योजना राबवण्याचा प्रयत्न कराल. नोकरीमध्ये अपेक्षित लाभ प्राप्त होतील. प्रेमविवाहास उत्सुक मंडळींना अनुकूल परिस्थिती राहील. |
| तूळ | जमिनीच्या व्यवहारामध्ये फायदा होईल. वडीलधाऱ्या मंडळींचा सल्ला महत्त्वाचा ठरेल. व्यवसायात मोठी उलाढाल करण्याचे योजाल. |
| वृश्चिक | व्यवसायामध्ये नवीन संधी फायदेशीर ठरतील. नवीन करार होतील. उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध होतील. |
| धनु | सरकारी कामांमध्ये अडचणी निर्माण होतील. संततीच्या सुवर्ता कानी पडतील. कुटुंबीयांशी पटवून घ्यावे लागेल. |
| मकर | कार्यक्षेत्रात विविध आर्थिक लाभ प्राप्त होतील. नवीन ओळखी फायदेशीर ठरतील. घरामध्ये एखाद्या समारंभाचे आयोजन कराल. |
| कुंभ | नोकरीमध्ये वरिष्ठांची मर्जी राहील. कुटुंबीयांवर अत्याधिक खर्च कराल. व्यवसायामध्ये नवीन संधी उपलब्ध होतील. |
| मीन | सरकारी कामांमध्ये यश मिळेल. नोकरीमध्ये अधिकार प्राप्त होतील. संततीचे सहकार्य लाभेल. |

## निकाल — गणेशलक्ष्मी भाग्यशाली विकली लॉटरी

सोडत संध्या. 5:00

सोडत दर सोमवार • सोडत क्रमांक 19 • तिकीट किं. रु.10/- • सोडत दिनांक 12/05/2025

पहिले बक्षिस रु. 10000/- : MG-04 : 4490 — ओम गं गणपतेय नमः लॉटरी - पुणे

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 5000/- : 6907

| तिसरे बक्षिस रु. 1000/- | | | | |
|---|---|---|---|---|
| 1149 (ओम गं गणपतेय नमः लॉटरी - पुणे) | 2922 (डायमंड कॉर्पोरेशन, बोरिवली) | 3243 (ओम गं गणपतेय नमः लॉटरी - पुणे) | 5867 (रुखमणी एन्टरप्रायझेस, औरंगाबाद) | 7326 |

चौथे बक्षीस रु. 400/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 400/- | 1815 | 3094 | 3743 | 4905 | 5553 | 6621 | 7475 | 8531 |
| 1068 | 1891 | 3182 | 3870 | 4992 | 5596 | 6627 | 7522 | 8600 |
| 1106 | 2027 | 3203 | 4103 | 5008 | 5687 | 6679 | 7587 | 8777 |
| 1109 | 2081 | 3312 | 4385 | 5235 | 5718 | 6683 | 7923 | 8823 |
| 1113 | 2136 | 3314 | 4411 | 5236 | 5822 | 6967 | 7967 | 8850 |
| 1131 | 2347 | 3371 | 4421 | 5503 | 5945 | 7247 | 7975 | 8857 |
| 1141 | 2416 | 3373 | 4692 | 5510 | 6362 | 7270 | 8084 | 8870 |
| 1462 | 2682 | 3416 | 4782 | 5514 | 6394 | 7377 | 8085 | 8875 |
| 1520 | 2817 | 3433 | 4799 | 5532 | 6406 | 7378 | 8215 | 8938 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी महाराष्ट्र गजलक्ष्मी सोम विकली लॉटरी

सोडत संध्या. 4:45 वाजता

सोडत दर सोमवार • सोडत क्रमांक 19 • तिकीट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 12/05/2025

| मालिका | GL-00 | GL-01 | GL-02 | GL-03 | GL-04 |
|---|---|---|---|---|---|
| पहिले बक्षिस रु. 10,000/- | 1346 (श्री सिद्धि समर्थ एजेंसी, दादर - मुंबई) | 4668 | 7493 | 6657 | 2887 |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| | | |
|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 3476 | 4020 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 0484 (जे. पी. एस. लॉटरी सेंटर - डहाणू) | 0745 (चिराग एन्टरप्रायझेस, नाशिक) | 1611 (महावीर लॉटरी सेंटर, कोल्हापूर) | 2072 | 5189 |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 0098 | 1173 | 1318 | 2457 | 2597 | 2881 | 3744 | 5159 | 6344 | 6642 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 0660 | 1405 | 1557 | 1661 | 1752 | 2515 | 5001 | 7681 | 8868 | 9602 |

सहावे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सहावे बक्षिस रु. 300/- | 0752 | 1609 | 2537 | 3490 | 4487 | 5572 | 6612 | 7417 | 8408 | 9391 |
| | 0761 | 1654 | 2635 | 3493 | 4538 | 5649 | 6633 | 7427 | 8419 | 9419 |
| 0022 | 0800 | 1659 | 2708 | 3809 | 4544 | 5750 | 6692 | 7526 | 8438 | 9429 |
| 0042 | 0885 | 1816 | 2765 | 3847 | 4559 | 5756 | 6765 | 7536 | 8483 | 9479 |
| 0066 | 0927 | 1819 | 2952 | 3969 | 4742 | 5796 | 6887 | 7591 | 8487 | 9539 |
| 0067 | 1031 | 1861 | 3094 | 3975 | 4828 | 5885 | 6907 | 7597 | 8718 | 9570 |
| 0075 | 1040 | 1933 | 3119 | 4004 | 5039 | 5915 | 6928 | 7706 | 8758 | 9587 |
| 0148 | 1067 | 1952 | 3135 | 4029 | 5107 | 5925 | 6936 | 7769 | 8780 | 9617 |
| 0152 | 1127 | 1968 | 3156 | 4084 | 5116 | 6021 | 6973 | 7777 | 8800 | 9641 |
| 0220 | 1211 | 2017 | 3170 | 4183 | 5118 | 6043 | 7043 | 7788 | 8808 | 9798 |
| 0281 | 1221 | 2032 | 3239 | 4243 | 5209 | 6068 | 7137 | 7797 | 8844 | 9849 |
| 0319 | 1274 | 2182 | 3265 | 4244 | 5315 | 6143 | 7227 | 7800 | 8860 | 9883 |
| 0373 | 1281 | 2228 | 3285 | 4279 | 5329 | 6292 | 7248 | 7877 | 8867 | 9909 |
| 0407 | 1372 | 2255 | 3305 | 4299 | 5351 | 6304 | 7271 | 7888 | 8878 | 9921 |
| 0477 | 1472 | 2268 | 3336 | 4394 | 5461 | 6316 | 7274 | 7971 | 8940 | 9929 |
| 0579 | 1514 | 2426 | 3367 | 4425 | 5527 | 6359 | 7305 | 7997 | 8985 | 9935 |
| 0585 | 1518 | 2478 | 3391 | 4434 | 5539 | 6364 | 7327 | 8117 | 9039 | 9936 |
| 0610 | 1586 | 2484 | 3412 | 4443 | 5555 | 6398 | 7364 | 8218 | 9192 | 9974 |
| 0691 | 1595 | 2492 | 3418 | 4461 | 5563 | 6466 | 7365 | 8308 | 9350 | 9979 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## शुभ राशी दि.१३/०५/२०२५

| | | |
|---|---|---|
| ६ | २ | ७ |
| ६२ | २१ | ७१ |
| ६७ | २६ | ७६ |
| १६९ | १२९ | ३५९ |
| ४५७ | ३४५ | १२४ |

# १८ वर्षांच्या तरुणीची पुण्यात भररस्त्यात हत्या

■ पुणे

पिंपरी-चिंचवडच्या वालेकर वाडी परिसरात काल रात्री साडेनऊ वाजताच्या सुमारास दुचाकीवर हेल्मेट घातलेल्या अज्ञातांनी कोमल जाधव (१८) या तरुणीवर धारदार शस्त्राने वार केले. या हल्ल्यात तरुणीचा मृत्यू झाला. या प्रसंगाचे सीसीटीव्ही फुटेज पोलिसांना मिळाले आहेत.त्यानुसार संबंधित हल्लेखोर तरुण त्याच परिसरात दुचाकीवरून फिरताना आढळले आहेत. याशिवाय ते कोमलच्या ओळखीचे असल्याची माहिती आहे. त्यामुळे ही हत्या कोणत्या कारणामुळे झाली याबाबत पोलीस तपास करत आहेत.

# धुळे - सोलापूर महामार्गावर अपघात परप्रांतीय पती आणि पत्नी जागीच ठार

■ जालना

धुळे - सोलापूर महामार्गावर काल रात्री साडेअकरा वाजताच्या सुमारास ट्रक आणि कारचा भीषण अपघात झाला. या अपघातात परप्रांतीय पती-पत्नी जागीच ठार झाले तर ५ जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींवर रुग्णालयात उपचार सुरु आहेत. हैदराबादहून शिर्डीला जातांना जालना जिल्ह्यातील धुळे-सोलापूर महामार्गावर




बारसवाडा फाट्याजवळ काल विरुद्ध दिशेने येणारा ट्रक आणि कारची जोरदार धडक झाली. हा अपघात इतका भीषण होता की या अपघातात कारचा चुराडा झाला. तर जी. रामू (४५) आणि जी. माधुरी (४०)या दाम्पत्याचा जागीच मृत्यू झाला. ते दोघेही हैदराबादचे रहिवासी होते. या अपघाताची माहिती मिळताच जालना पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी जखमींना स्थानिकांच्या मदतीने तातडीने रुग्णालयात दाखल केले.

# नवी मुंबई विमानतळापर्यंतचा मार्ग लवकरच खुला होणार! काम अंतिम टप्प्यात

■ उरण

नवी मुंबई विमानतळ टर्मिनलपर्यंत प्रवाशांना थेट पोहचता यावे यासाठी सिडको महामंडळ आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (एनएचएआय) उत्तम दळणवळणाची सुविधा उभारत असून त्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. पुढील काही दिवसांत हा मार्ग विमान प्रवास करणाऱ्यांसाठी खुला होणार असल्याचे संकेत सिडकोने नुकतेच दिले. विमानतळाला पश्चिमेकडून दळणवळणाची सुविधा प्रदान करण्याकरिता विकसित करण्यात येत असलेल्या पश्चिम प्रवेश आंतरबदलाचे काम जून २०२५ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित असल्याचे सिडकोने म्हटले आहे. यामुळे आम्रमार्ग आणि उलवे सागर किनारी मार्ग येथून विमानतळाकडे ये-जा करणारी वाहतूक सुरळीत होईल.

## महाराष्ट्र सागरलक्ष्मी विकली लॉटरी

सोडत दर सोमवारी • तिकीट किंमत रु. 50/- • सोडत क्र. 19 • सोडत दिनांक 12/05/2025

पहिले सामाईक बक्षिस रु. 7 लाख : SL-03 : 2655

उत्तेजनार्थ बक्षिस रु. 5000/- : पहिल्या बक्षीसाची विजेता मालिका सोडून इतर सर्व मालिकांसाठी 2655 — जलाराम लॉटरी - अकोला

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 1027 | 1207 | 2119 | 2894 | 2905 | 5931 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 1312 | 1561 | 2166 | 3172 | 3963 | 6309 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 2456 | 4160 | 4347 | 6182 | 6301 | 6472 |
| पाचवे बक्षिस रु. 200/- | 1349 | 2015 | 2433 | 2832 | 2996 | 5115 |

सहावे बक्षिस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रु.100/- (सर्व मालिकांसाठी) | | 1847 | 2296 | 2870 | 3272 | 3593 | 4094 | 4543 | 5125 | 5545 | 5867 | 6255 | 6668 |
| | | 1848 | 2322 | 2878 | 3290 | 3612 | 4100 | 4553 | 5127 | 5547 | 5871 | 6259 | 6672 |
| 1000 | 1365 | 1857 | 2353 | 2882 | 3298 | 3613 | 4113 | 4583 | 5130 | 5548 | 5874 | 6274 | 6675 |
| 1002 | 1369 | 1869 | 2392 | 2886 | 3302 | 3639 | 4114 | 4585 | 5140 | 5550 | 5878 | 6280 | 6679 |
| 1010 | 1418 | 1871 | 2408 | 2889 | 3303 | 3643 | 4176 | 4599 | 5141 | 5552 | 5882 | 6283 | 6687 |
| 1017 | 1461 | 1889 | 2427 | 2917 | 3313 | 3649 | 4178 | 4642 | 5144 | 5562 | 5925 | 6292 | 6689 |
| 1021 | 1475 | 1919 | 2439 | 2921 | 3314 | 3675 | 4179 | 4674 | 5162 | 5565 | 5928 | 6311 | 6690 |
| 1037 | 1478 | 1928 | 2440 | 2922 | 3320 | 3691 | 4204 | 4677 | 5165 | 5570 | 5933 | 6336 | 6744 |
| 1077 | 1487 | 1932 | 2451 | 2925 | 3321 | 3692 | 4219 | 4691 | 5175 | 5573 | 5936 | 6361 | 6761 |
| 1081 | 1488 | 1946 | 2452 | 2928 | 3323 | 3707 | 4226 | 4694 | 5179 | 5574 | 5945 | 6406 | 6763 |
| 1096 | 1490 | 1971 | 2455 | 2935 | 3329 | 3736 | 4242 | 4704 | 5187 | 5575 | 5950 | 6415 | 6764 |
| 1097 | 1517 | 1979 | 2469 | 2938 | 3336 | 3738 | 4253 | 4709 | 5191 | 5578 | 5952 | 6420 | 6765 |
| 1105 | 1524 | 1993 | 2479 | 2955 | 3348 | 3763 | 4263 | 4743 | 5201 | 5585 | 5958 | 6425 | 6766 |
| 1109 | 1530 | 1994 | 2480 | 2982 | 3350 | 3770 | 4284 | 4744 | 5219 | 5589 | 5963 | 6437 | 6770 |
| 1121 | 1531 | 2012 | 2488 | 2989 | 3351 | 3772 | 4290 | 4749 | 5229 | 5596 | 5982 | 6440 | 6776 |
| 1128 | 1551 | 2025 | 2497 | 2998 | 3355 | 3777 | 4324 | 4758 | 5250 | 5635 | 5995 | 6456 | 6788 |
| 1155 | 1570 | 2035 | 2522 | 3001 | 3358 | 3788 | 4334 | 4787 | 5255 | 5648 | 6045 | 6466 | 6796 |
| 1160 | 1618 | 2042 | 2528 | 3027 | 3363 | 3810 | 4338 | 4790 | 5260 | 5675 | 6067 | 6474 | 6807 |
| 1170 | 1645 | 2070 | 2541 | 3030 | 3376 | 3832 | 4344 | 4799 | 5285 | 5685 | 6068 | 6481 | 6808 |
| 1176 | 1651 | 2082 | 2542 | 3033 | 3377 | 3839 | 4347 | 4845 | 5308 | 5686 | 6069 | 6503 | 6827 |
| 1181 | 1659 | 2120 | 2581 | 3042 | 3395 | 3907 | 4382 | 4855 | 5345 | 5708 | 6070 | 6546 | 6837 |
| 1190 | 1660 | 2123 | 2597 | 3068 | 3408 | 3909 | 4423 | 4857 | 5351 | 5713 | 6075 | 6549 | 6841 |
| 1191 | 1663 | 2162 | 2614 | 3073 | 3410 | 3935 | 4425 | 4880 | 5361 | 5730 | 6081 | 6566 | 6844 |
| 1192 | 1670 | 2166 | 2626 | 3095 | 3423 | 3936 | 4432 | 4892 | 5365 | 5750 | 6089 | 6567 | 6846 |
| 1194 | 1671 | 2196 | 2628 | 3097 | 3426 | 3945 | 4438 | 4964 | 5371 | 5753 | 6096 | 6568 | 6849 |
| 1208 | 1712 | 2208 | 2638 | 3120 | 3429 | 3956 | 4439 | 4973 | 5375 | 5756 | 6106 | 6594 | 6865 |
| 1218 | 1718 | 2213 | 2661 | 3123 | 3437 | 3988 | 4441 | 5000 | 5405 | 5765 | 6107 | 6600 | 6877 |
| 1220 | 1720 | 2217 | 2675 | 3152 | 3459 | 3990 | 4449 | 5002 | 5421 | 5775 | 6152 | 6614 | 6906 |
| 1225 | 1729 | 2220 | 2697 | 3167 | 3503 | 3993 | 4460 | 5009 | 5427 | 5780 | 6165 | 6617 | 6920 |
| 1241 | 1731 | 2228 | 2795 | 3183 | 3514 | 4014 | 4466 | 5022 | 5445 | 5793 | 6202 | 6625 | 6929 |
| 1252 | 1747 | 2246 | 2820 | 3186 | 3538 | 4015 | 4471 | 5040 | 5454 | 5795 | 6211 | 6634 | 6952 |
| 1275 | 1756 | 2261 | 2822 | 3199 | 3548 | 4030 | 4480 | 5048 | 5465 | 5797 | 6216 | 6639 | 6964 |
| 1279 | 1761 | 2274 | 2825 | 3202 | 3558 | 4046 | 4483 | 5054 | 5478 | 5835 | 6221 | 6645 | 6980 |
| 1296 | 1791 | 2276 | 2829 | 3203 | 3566 | 4049 | 4484 | 5091 | 5505 | 5852 | 6238 | 6647 | 6983 |
| 1304 | 1794 | 2283 | 2836 | 3235 | 3575 | 4070 | 4485 | 5108 | 5514 | 5858 | 6241 | 6651 | 6984 |
| 1320 | 1810 | 2294 | 2850 | 3249 | 3583 | 4079 | 4519 | 5118 | 5517 | 5862 | 6251 | 6666 | 6986 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी महाराष्ट्र सह्याद्री

• धनलक्ष्मी विकली लॉटरी •

सोडत सायं. 4:30 वाजता

सोडत दर सोमवार • सोडत क्रमांक 19 • तिकीट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 12/05/2025

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- : SL-00 : 1760 — श्री गणेश एन्टरप्रायझेस, दादर, मुंबई

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 5000/- : 1293 — किशोर लॉटरी सेंटर, सांगली

| | | | |
|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 3639 | 3987 | 5517 |

चौथे बक्षीस रु. 700/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1415 | 2240 | 3371 | 4413 | 5260 |
| 1502 | 2266 | 3464 | 4418 | 5343 |
| 1535 | 2441 | 3653 | 4541 | 5571 |
| 1728 | 2579 | 3739 | 4698 | 5612 |
| 1791 | 2624 | 3783 | 4844 | 5654 |
| 1858 | 2848 | 3803 | 4982 | 5718 |
| 1877 | 3298 | 4027 | 5079 | 5750 |
| 2206 | 3337 | 4411 | 5253 | 5965 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी


### वाचकांना सूचना

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वत:च्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी. - मॅनेजर, 'नवाकाळ'

## रणथंभोरमध्ये वाघाच्या हल्ल्यात कर्मचारी ठार

■ जयपूर

**राजस्थानच्या** रणथंभोर व्याघ्र प्रकल्पात परिक्षेत्र - ३ मध्ये वाघाने केलेल्या हल्ल्यात वन कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला. देवेंद्र चौधरी असे या कर्मचाऱ्याचे नाव आहे. काल दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास तो जोगी महल परिसरात नेहमीप्रमाणे वाघांच्या हालचालींवर देखरेख ठेवत असताना अचानक वाघाने त्याच्यावर हल्ला चढवला. हल्ल्यात मरण पावलेल्या चौधरी याच्या छातीवर बराच वेळ वाघ बसून राहिला. त्याला तेथून दूर हाकलण्यासाठी वन कर्मचाऱ्यांना बरेच प्रयत्न करावे लागले. वाघ पळून गेल्यानंतर कर्मचाऱ्यांनी देवेंद्रला तातडीने जिल्हा रुग्णालयात हलवले. मात्र तिथे दाखल करून घेण्याआधीच डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

## मोटू म्हटल्याच्या रागातून नातेवाईकावर गोळीबार

■ गोरखपूर

**भल्या** भल्यांना लावील बट्टा अशी ही थट्टा अशी एका लोकगीताची ओळ आहे. अशा चेष्टेतून चक्क आपल्या नातेवाईकांवर गोळ्या झाडल्याची घटना उत्तर प्रदेशातील गोरखपूर येथे घडली आहे. शरीराने जाड असलेल्या एकाला मोटू असे चिडवल्याने त्याने हा गोळीबार केला असून त्याच्यावर गुन्हा नोंदवण्यात आला आहे. अर्जुन चौहान हा एका मेजवानीसाठी गेला होता. त्यावेळी तिथे मंजीहारिया गावातील त्याचे नातेवाईक अनिल व शुभम आले होते. अर्जुन हा जाड असल्याकारणाने त्यांनी त्याला मोटू मोटू असे अनेकवेळा चिडवले. अर्जुन संतप्त झाला. मात्र त्याने त्यावेळी तिथे काहीही केले नाही. दुसऱ्या दिवशी तो आपल्या असिफ खान या मित्राला घेऊन तेनुआ टोल नाक्यावर उभा राहिला. त्याचवेळी अनिल व शुभम आपल्या गाडीतून जात होते. अर्जुन व आसिफने त्यांची गाडी अडवली. त्यांना गाडीतून बाहेर काढले व त्यांच्यावर अंदाधुंद गोळ्या झाडल्या. त्यात ते दोघेही जखमी झाले. त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्यांची प्रकृती सुधारत असल्याची माहिती रुग्णालयाने दिली आहे. पोलीस अधीक्षक जितेंद्र कुमार यांनी म्हटले आहे की, या प्रकरणी जखमींनी दिलेल्या फिर्यादीवरून अर्जुन व आसिफ यांच्यावर गुन्हा नोंदवण्यात आला.

देश विदेश

## सोमालियाच्या मोगादिशूमध्ये पूर! घरांत पाणी शिरले! ७ जणांचा मृत्यू

■ मोगादिशू



**सोमालियाची** राजधानी मोगादिशूमध्ये मुसळधार पावसामुळे मोठा पूर आला. त्यात ७ जणांचा मृत्यू झाला आणि मुख्य रस्ते पाण्याखाली आल्यामुळे वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली. अनेक लोकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले असून मोठ्या प्रमाणात बचावकार्य सुरू असल्याचे प्रादेशिक प्रशासनाचे प्रवक्ते अब्दिनासिर हिरसी इडल यांनी सांगितले. मोगादिशूमध्ये शनिवारी रात्री आठ तास मुसळधार पाऊस कोसळला. त्यामुळे येथे कंबरेपर्यंत पाणी साचल्याने लोकांचे जनजीवन विस्कळीत झाले. मोगादिशूच्या वेगवेगळ्या परिसरात १२ घरे कोसळल्याने ११ जण जखमी झाले आणि ६ प्रमुख रस्त्यांवर पाणी साचल्यामुळे संपूर्ण वाहतूक थांबली, तर काही ठिकाणी पुराच्या पाण्यात लोक अडकून पडले. अदन अब्दुल विमानतळावरील वाहतूक विस्कळीत झाले. पूरग्रस्त भागातील मोहम्मद हसन यांनी सांगितले की, पुरामुळे आम्ही रात्र छतावर घालवली. घरात पाणी शिरल्याने वस्तू वाहून गेल्या. त्यात तापमानही घसरले होते. त्यामुळे आमची अवस्था अधिकच वाईट झाली.

## दिल्लीत पी. व्ही. नरसिंहरावांचा पुतळा उभारण्यास मंजुरी

■ नवी दिल्ली

**नवी** दिल्लीच्या तेलंगणा भवनात माजी पंतप्रधान पी.व्ही. नरसिंहराव यांचा पुतळा उभारण्यास दिल्ली शरही कला आयोगाने मंजूरी दिली आहे. नवी दिल्ली महानगरपालिकेनेही या प्रस्तावाला मंजूरी दिली आहे. या पुतळ्याला परवानगी दिली असली तरी तेलंगणा भवनात मात्र याविषयी अनभिज्ञता आहे. तेलंगणा भवन सध्या आंध्र भवन मध्येच असल्यामुळे हा पुतळा इथे उभारण्याविषयी काहीही बोलण्यास त्यांनी नकार दिला आहे. माजी पंतप्रधान पीव्ही नरसिंहाराव यांचा पुतळा ज्या ठिकाणी उभरण्यात येणार आहे , त्या ठिकाणी अतिरीक्त प्रकाशयोजना व तेथील उखडलेल्या लाद्या पुन्हा बसवण्याची शिफारसही कला आयोगाने केली आहे. दरम्यान



या पुतळ्याच्या प्रस्तावाविषयी संभ्रम असून हा प्रस्ताव आम्ही तयार केला नसल्याचे महानगरपालिकेने म्हटले आहे. यावर केंद्र सरकारकडून येणाऱ्या आदेशाची वाट पाहात असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. आंध्र भवनमधील तेलंगणाच्या अधिकाऱ्यांनी म्हटले आहे की, अशोका रोडवर नव्या तेलंगणा भवनाचा प्रस्ताव मुख्यमंत्र्यांनी दिला आहे. त्यानंतर हा पुतळा तिथे उभारायचा आहे का याविषयी आम्हाला काहीही माहिती नाही. त्यामुळे केंद्र सरकारच्या निश्चित सूचना येईपर्यंत हा प्रस्ताव अधांतरीच आहे.

## इम्रान यांच्या पॅरोलसाठी केलेली याचिका न्यायालयाने फेटाळली

■ इस्लामाबाद

**पाकिस्तानचे** माजी पंतप्रधान आणि पाकिस्तान तहरीक-ए-इंसाफ पक्षाचे संस्थापक इम्रान खान यांची पॅरोलवर सुटका करण्याची मागणी करणारी याचिका इस्लामाबाद उच्च न्यायालयाने फेटाळली. इम्रान खान यांचे समर्थक आणि खैबर पख्तूनख्वाचे मुख्यमंत्री अली अमीन गंडापूर यांनी वकील लतीफ खोसा यांच्यामार्फत ही याचिका दाखल केली होती. इम्रान खान यांच्या आरोग्यावर दीर्घकाळ तुरुंगवासाचा परिणाम आणि भारतासोबतच्या तणावाच्या परिस्थितीमुळे त्यांच्या जीवाला धोका असल्याचा दावा के. पी. अली अमीन यांनी करत याचिका दाखल केली. उच्च न्यायालयाने म्हटले की, ही याचिका आरोपी व्यक्तीने स्वतः दाखल केली नव्हती. त्यामुळे आम्ही ही याचिका फेटाळत आहोत.

## व्लादिमिर पुतिन यांच्या युद्धबंदी प्रस्तावाचे झेलेन्स्कींकडून स्वागत

■ कीव

**रशियाचे** राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांनी युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष झेलेन्स्की यांना इस्तंबूलमध्ये थेट युद्धबंदीच्या चर्चेची ऑफर दिली होती. या चर्चेचा उद्देश कायमस्वरुपी संघर्षविराम आणि शांतता प्रस्थापित करणे असल्याचे पुतिन यांनी म्हटले. यावर झेलेन्स्की यांनी रशियाच्या युद्धबंदीच्या थेट चर्चेचे स्वागत केले. झेलेन्स्की यांनी म्हटले की, अखेर रशियाने युद्धबंदीसाठी विचार सुरू केला. रशियाचे हे एक सकारात्मक पाऊल आहे. पुतिन खरेच युद्ध संपवू इच्छित आहे, तर त्यांनी एकही दिवस हल्ले करू नयेत. कोणाचीही हत्या व्हायला नको. आम्हाला आशा आहे की रशिया पूर्ण आणि विश्वासार्ह युद्धबंदी लागू करेल. संपूर्ण जग गेल्या अनेक दिवसांपासून याची वाट पाहत आहे.

## अकोल्यात वेगवेगळ्या ठिकाणी दोन नीट परीक्षार्थींची आत्महत्या

■ अकोला

**अकोला** जिल्ह्यात दोन वेगवेगळ्या ठिकाणी एकाच दिवशी नीट परीक्षेची तयारी करणाऱ्या दोन विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली. तेल्हारा तालुक्यातील रायखेडचा रहिवासी पार्थ नेमाडे (१७) हा न्यू अकॅडमी येथे नीट परीक्षेची शिकवणी घेत होता. त्याने घरात विषारी औषध प्यायले. ही गोष्ट घरच्यांच्या निदर्शनास आल्यावर त्यांनी त्याला रुग्णालयात दाखल केले. परंतु डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. तर उमरीचा रहिवासी अर्णव देबाजे(१८) हासुद्धा नीट परीक्षेचाच सराव करत होता. त्यानेही याच दिवशी आत्महत्या केली. या दोन्ही विद्यार्थ्यांनी एकाच दिवशी आत्महत्या केल्याने अकोल्यात खळबळ उडाली आहे. त्यांच्या आत्महत्येचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. परंतु स्थानिक पोलिसांनी याप्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.

## उरण नगरपरिषदेवर कामगारांचा १६ मे रोजी धडक मोर्चा

■ उरण

उरण नगरपरिषदेतील म्युनिसिपल एम्प्लॉईज युनियनचे कार्याध्यक्ष संतोष पवार यांच्यावर अन्यायकारक निलंबनाचा विडा उचलणाऱ्या मुख्याधिकारी समीर जाधव याचा जाहीर निषेध करण्यासाठी १६ मे रोजी धडक मोर्चा काढण्यात येणार आहे. ज्यांनी कोविडच्या काळात जीव धोक्यात घालून उरणवासियांची सेवा केली, अशा ११ कंत्राटी सफाई कामगारांना कोणतीही नोटीस न देता कामावरून कमी करण्यात आले. तसेच या कामगारांसाठी न्यायाची मागणी करणाऱ्या नेत्यालाच निलंबनाची शिक्षा देण्यात आली. याचा जाब या मोर्चाद्वारे विचारण्यात येणार आहे.

## कर्नाटक काँग्रेसने चुकीचा नकाशा ट्विट केल्याने वाद

**संबंधितांवर कारवाई होणार**

■ बंगळुरु

**कर्नाटक** काँग्रेसने नुकताच ट्विट केलेल्या नकाशात जम्मू-काश्मीर हे पाकिस्तानात दाखवल्याने एक नवा वाद सुरू झाला आहे. या चुकीबद्दल काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षांनी संबंधितांवर कठोर कारवाई करत त्यांना काढून टाकले आहे. पाकिस्तानला आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने ८ हजार कोटी कर्ज देण्याच्या विरोधात कर्नाटक काँग्रेसने एक ट्विट केले होते. त्यात दाखवण्यात आलेल्या नकाशात काश्मीर पाकिस्तानात दाखवण्यात आले. ही चूक लक्षात आल्याबरोबर हे ट्विट हटवण्यात आले असून, ही पोस्ट तयार करणाऱ्यांवर कारवाई करण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष डी. के. शिवकुमार यांनी म्हटले आहे की, ही एक लहानशी चूक आहे. मात्र ती झाली आहे. आम्ही हे ट्विट हटवले आहे. जम्मू-काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग आहे व तो राहीलच. यावरून भाजपाने काँग्रेसवर टीका केली आहे. चूक करणाऱ्यांवर मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी यावर कठोर कारवाई करण्याची मागणीही भाजपाने केली आहे.

## युद्ध म्हणजे रोमँटिक सिनेमा नव्हे माजी लष्करप्रमुखांचे वक्तव्य

■ पुणे

भारत-पाकिस्तान दरम्यान शस्त्रसंधी झाल्याच्या पार्श्वभूमीवर माजी लष्कर प्रमुख जनरल (निवृत्त) मनोज नरवणे यांनी युद्धाच्या भयावह परिणामांचे स्मरण करून दिले. युद्ध म्हणजे बॉलिवूडमधील एखादा रोमँटिक सिनेमा नव्हे, अशा शब्दांत नरवणे यांनी युद्धाचे किती भयंकर परिणाम होतात, हे अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला. पुणे येथील इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अकाउंटंटस ऑफ इंडिया या संस्थेच्या हिरक महोत्सवी समारंभात नरवणे बोलत होते. युद्ध म्हणजे मृत्युचे तांडव आणि महाभयंकर विनाश. युद्धाची मोठी किंमत दोन्ही देशांना कमी-जास्त प्रमाणात चुकवावीच लागते. शस्त्रास्त्र आणि मनुष्यहानी होते. युद्धाचे परिणाम येणाऱ्या पिढ्यांना भोगावे लागतात. त्याच्या कटू आठवणी पिढ्यान्‌पिढ्या विसरता न येण्यासारख्या असतात.

## मुंबईच्या रस्ते कामात भ्रष्टाचार मुख्यमंत्र्यांकडे भाजपा नेत्याची तक्रार

**माजी नगरसेवक नार्वेकर यांचे पत्र**

■ मुंबई

मुंबई महापालिकेकडून शहरातील रस्त्यांचे सिमेंट काँक्रीटीकरण करण्याचे काम सुरू आहे. याकामात भ्रष्टाचार झाल्याची तक्रार भाजपा नेते आणि माजी नगरसेवक मकरंद नार्वेकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. माजी नगरसेवक नार्वेकर यांनी पत्रात लिहिले की, महापालिकेच्या ए वॉर्डमधील नरिमन पॉईंट, कुलाबा परिसरात वर्क कोड सी ३२० अंतर्गत सिमेंट काँक्रीटीकरणाचे मोठ्या प्रमाणात काम सुरू आहे. यामध्ये २२ रस्त्यांचा समावेश असून त्यासाठी १६४ कोटी रुपयांच्या खर्चाची तरतूद आहे. काही कंत्राटदार आणि मुंबई महापालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांमध्ये संगनमत असल्यामुळे बिलामध्ये वाढ होऊन सार्वजनिक निधीचा गैरवापर होत आहे. या रस्ते कामातील साहित्याच्या प्रमाणात जाणूनबुजून वाढ केली आहे. धातू, रेती, स्टील आणि सिमेंट यासारख्या बांधकाम साहित्याची प्रत्यक्ष खरेदी सुमारे ५० टन होती. परंतु कंत्राटदारांनी महापालिकेला १०० टनांचे बिल दिले आहे. यामुळे रक्कम दुप्पट होऊन सरकारी तिजोरीवर अनावश्यक भार पडला आहे. यामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचे स्पष्ट होते.

## बार्टीच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांचे मानधन ४६ टक्क्यांनी वाढले

■ मुंबई

बार्टीच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांचे मानधन ४६ टक्के वाढवण्याचा निर्णय राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी जाहीर केला. यामुळे बारा वर्षांपासून या संस्थेत कंत्राटी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना दिलासा मिळाला आहे. मंत्री संजय शिरसाट म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण (बार्टी) संस्थेत मागील १२ वर्षांपासून मानधनावर काम करणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मानधनात महागाई भत्त्यानुसार ४६ टक्के वाढ केली आहे. हे कर्मचारी अनेक वर्षांपासून मानधनावर काम करत आहेत. वाढत्या महागाईमुळे निर्माण झालेल्या आर्थिक अडचणी लक्षात घेऊन वाढ अत्यंत आवश्यक होती. हा निर्णय सामाजिक न्यायाची खरी अंमलबजावणी असल्याची भावना सर्व कर्मचाऱ्यांनी व्यक्त करून मंत्री शिरसाट यांचे आभार मानले.

## रायगडमध्ये शेकापचे हजारो पदाधिकारी भाजपात

**जयंत पाटलांना धक्का**

■ पनवेल

रायगड जिल्ह्यात शेतकरी कामगार पक्षाला (शेकाप) आणखी एक मोठा झटका बसला आहे. पनवेल नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे आणि पनवेल महानगरपालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांच्यासह हजारो पदाधिकारी आणि लोकप्रतिनिधींनी शेकापचा राजीनामा देऊन भाजपात प्रवेश केला. स्थानिक निवडणुकीच्या तोंडावर झालेला हा पक्षप्रवेश भाजपासाठी मोठी ताकद ठरली असून, यामुळे जयंत पाटलांना मोठा धक्का बसला आहे. उलवे नोड येथील रामशेठ ठाकूर मैदानावर झालेल्या भव्य कार्यक्रमात भाजपाचे प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण, माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला. गेल्या महिन्यातच जयंत पाटील यांचे बंधू माजी आमदार पंडितशेठ पाटील, माजी मंत्री मिनाक्षीताई पाटील यांचे चिरंजीव आणि रायगड जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष ॲड. आस्वाद पाटील यांनीही भाजपात प्रवेश केला होता. त्यामुळे आधी शिवसेना आणि राष्ट्रवादी पक्षानंतर शेकापमध्येही फूट पडल्याचे बोलले जात होते. त्यानंतर आता जे.एम. म्हात्रे, प्रीतम म्हात्रे यांच्यासह असंख्य पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी शेकाप सोडल्यामुळे रायगडसह राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ निर्माण झाली आहे.

## भोपाळ एम्समध्ये शिकणाऱ्या तरुणाची पुण्यात आत्महत्या


■ पुणे

**भोपाळ** येथील एम्स रुग्णालयात वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या बीड जिल्ह्यातील उत्कर्ष हिंगणे या तरुणाने पुण्यातील वानवडी परिसरातील पंचरत्न हाऊसिंग सोसायटी येथे गळा चिरून आत्महत्या केली. आत्महत्येपूर्वी त्याने व्हॉट्सॲपवर सुसाईड नोट लिहून अभ्यासाच्या तणावामुळे आत्महत्या करत असल्याचे नमूद केले आहे. वरिष्ठ निरीक्षक सत्यजित आदमाने यांनी सांगितले की, उत्कर्ष काही दिवसांपूर्वी एका खासगी कार्यक्रमासाठी पुण्यात आला होता. आज सकाळी १० वाजता पुणे पोलीस नियंत्रण कक्षाला वानवडी परिसरात एका तरुणाचा मृतदेह सापडल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता उत्कर्षचा मृतदेह बाथरूममध्ये गळा चिरलेल्या अवस्थेत आढळून आला.

## सिंहगड किल्ल्याच्या २८५ कोटींच्या विकास आराखड्याला मंजुरी

■ पुणे

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचा आणि हिंदवी स्वराज्याचे सुभेदार नरवीर तानाजी मालुसरे यांच्या त्यागाचा जिवंत साक्षीदार असलेल्या सिंहगड किल्ल्याला पुन्हा एकदा शिवकालीन वैभव प्राप्त होणार आहे. स्थानिक आमदार भीमराव तापकीर यांच्या पुढाकारातून राज्य सरकारने २८५ कोटी रुपये खर्चाचा विकास आराखडा मंजूर केला आहे.



या विकास आराखड्याअंतर्गत किल्ल्यावरील उन्मळून पडलेला कल्याण दरवाजा, पुणे दरवाजा, ढासळलेली तटबंदी, बुरुज, पायऱ्या व पाऊलवाटा यांचे शिवकालीन स्थापत्यशैलीत पुनर्बांधकाम होणार आहे. तसेच पर्यटकांच्या सुरक्षेसाठी रेलिंगची व्यवस्था, शिवकालीन अमृतेश्वर मंदिर व इतर मंदिरे यांचा जीर्णोद्धार, संग्रहालय उभारणी, दिशादर्शक फलक, पाणी व पार्किंग सुविधा, प्रकाश योजना आणि ५२ जलस्त्रोतांचे संवर्धन व पुनरुज्जीवन यांचा समावेश आहे. सिंहगडच्या इतिहासात प्रथमच इतक्या मोठ्या निधीचा विकास आराखडा मंजूर झाला आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात नुकतेच या आराखड्याचे सादरीकरण करण्यात आले. याला उपमुख्यमंत्री व पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी तत्त्वतः मान्यता देत हिरवा कंदील दाखवला आहे.

## नाशिकच्या मखमलाबाद शिवारात बिबट्याचा वावर

■ नाशिक

नाशिकच्या मखमलाबाद शिवारात सलग दुसऱ्या दिवशी नागरिकांना बिबट्या दिसला. या परिसरातील ओमकार पिंगळे यांच्या घरासमोर रात्री १२ वाजताच्या सुमारास बिबट्याचा वावर आढळला. पिंगळे यांनी घराबाहेर लावलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात बिबट्याचे फुटेज चित्रीत झाले. यामुळे



परिसरात दहशतीचे वातावरण पसरले आहे. रात्रीच्या वेळी या परिसरात फिरणाऱ्या बिबट्याला त्वरित पिंजऱ्यात कैद करण्याची मागणी नागरिकांनी वनविभागाकडे केली आहे.

## सुट्टी रद्द झाल्याने ड्यूटीवर निघालेल्या जवानाचा अपघात! पत्नीचा मृत्यू

**३ वर्षांची चिमुकली गंभीर**

■ नवी दिल्ली

पाकिस्तानसोबतच्या तणावाच्या पार्श्वभूमीवर भारतातील सर्व लष्करी कर्मचाऱ्यांच्या सुट्ट्या रद्द करण्यात आल्या आहेत. या आदेशानंतर ड्युटीवर परतणाऱ्या मेजर विक्रम गुप्ता यांच्या गाडीला दिल्ली-मुंबई महामार्गावर अपघात झाला. यात त्यांच्या पत्नी वैशाली गुप्ता यांचा जागीच मृत्यू, तर तीन वर्षांची मुलगी रिहाना गंभीर जखमी झाली आहे. सध्या तिच्यावर अलवरमधील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मेजर विक्रम गुप्ता कुटुंबासह कोटा येथून दिल्लीला परतत असताना त्यांच्या कारचा टायर अचानक फुटला, त्यामुळे कार अनियंत्रित होऊन रस्त्यावर उलटली. या भीषण अपघातात वैशाली गुप्ता यांचा जागीच मृत्यू, तर रिहाना गुप्त जखमी झाली. अपघातानंतर कारचे दरवाजे उघडल्याने आई आणि मुलगी रस्त्यावर फेकल्या गेल्या. स्थानिक नागरिकांच्या मदतीने दोघांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. वैशाली यांच्या मृतदेहाचे शवविच्छेदन करून मृतदेह कुटुंबीयांच्या ताब्यात देण्यात आला आहे. रिहानाची प्रकृती चिंताजनक असून डॉक्टरांचे प्रयत्न सुरू आहेत.

मेजर विक्रम गुप्ता हे दिल्लीतील दिलशाद गार्डन परिसरात राहतात. सुट्टीदरम्यान ते पत्नी आणि मुलीसह नातेवाइकांकडे कोटा येथे गेले

## मुरबाडमध्ये नदीवरील नव्या पुलांचे बांधकाम युद्धपातळीवर सुरू

■ मुरबाड

कल्याण मुरबाड नगर राष्ट्रिय महामार्ग ६१ चे मागील वर्षा पासून काँक्रीटीकरण व रुंदीकरणाचे काम सुरू आहे. या मार्गावर उल्हास नदी व मुरबाडी नदी अशा दोन नद्या असून या नद्यांवर नव्या पुलांचे काम सध्या युद्ध पातळीवर सुरू आहे. राष्ट्रीय महामार्गाचे रुंदीकरण व काँक्रीटीकरण कामाचा वेग जरी चांगला असला तरी उल्हासनदी व मुरबाडी नदी वरील पूल नव्याने बांधले जात असल्याने मुरबाडी नदीतून पर्यायी रस्ता तयार करून नव्या पुलाची उभारणी सुरू आहे या पुलावरील गर्डर टाकण्याचे काम पूर्ण झाले असून त्यावरील काँक्रीटीकरण बाकी आहे तर उल्हास नदी वरील पुलाच्या कामात काही गर्डर टाकण्याचे काम झाले असून काही गर्डर टाकणे बाकी आहे. त्यामुळे हे पूल वेळीच पूर्ण होतील का याची चर्चा आहे.

## गाळ उपसा फसवणूकप्रकरणी ठेकेदार तीन वर्षे काळ्या यादीत

**गुन्हा दाखल करण्यासंदर्भात पत्र**

■ मुंबई

**मुंबई** शहरातील नाल्यातून गाळ काढण्याच्या कामात फसवणूक करणाऱ्या ठेकेदाराविरुद्ध महानगरपालिका प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला आहे. महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्यासह वरिष्ठ अधिकारी नालेसफाईची पाहणी करत आहेत. या कामात हलगर्जीपणा करून पालिकेची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी मे. भूमिका ट्रान्सपोर्ट कंपनीच्या ठेकेदाराला तीन वर्षांसाठी काळ्या यादीत टाकून त्याची पालिकेतील अभियांत्रिकी विषयक नोंदणी रद्द केली आहे. याशिवाय त्याच्याविरोधात पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यासंदर्भात पत्र दिले आहे. चेंबूर विभागातील एम पश्चिम भागात लहान नाल्यातून गाळ काढण्याच्या कामांदरम्यान संबंधित कंत्राटदार गाळासोबतच राडारोडा मिश्रण करून पर्यायाने गाळाचे वजन वाढवत असल्याची तक्रार पर्जन्य जलवाहिनी विभागास मिळाली. या तक्रारीसह व्हिडिओही प्राप्त झाला होता. ज्यामध्ये वाहनाचा क्रमांक दिसत होता. त्या क्रमांकाच्या आधारे सदर वाहन कोणत्या कंत्राटदाराकडे नोंदणीकृत आहे, व्हिडिओ कोणत्या दिवसाचा आहे याची माहिती घेऊन एआय प्रणालीच्या माध्यमातून त्या वाहनाच्या इतर खेपांची तपासणी केली. त्यात गाळ काढताना, भरताना आणि विल्हेवाट लावतानाचे व्हिडिओ तपासले.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# भारतीय सैन्याच्या युद्धनीतीची क्षमता

युद्धविराम झाल्याची घोषणा, त्या त्याबद्दलचा जनतेच्या मनामधला संभ्रम आणि प्रत्यक्ष आपल्या भारतीय सैन्याच्या तीनही दलांनी बजावलेली कामगिरी या सगळ्यांचा एकत्रितपणे विचार केला तर भारताने स्वतःहून शस्त्रसंधीची तयारी दाखवलेली नव्हती. पाकिस्तानला भारताने केलेल्या कारवाईची भीती वाटल्यानंतरच अमेरिकेच्या माध्यमातून हा शस्त्रसंधी घडवून आणण्याचा त्यांनी प्रयत्न केला. ज्याला भारताने युद्ध नको शांतता हवी या तत्त्वावर प्रतिसाद दिलेला होता. संपूर्ण संघर्षाच्या कालावधीत पहिल्यांदाच तीनही दलाच्या अधिकाऱ्यांनी घेतलेली संयुक्त पत्रकार परिषद ही खूप काही सांगून जाणारी आहे. त्यांनी जवळपास तास दीड तास या सगळ्या संघर्षात घडून आलेल्या वेगवेगळ्या प्रसंगांचे वर्णन केले. संपूर्ण घटनाक्रम सांगितलेला आहे. ज्यामध्ये भारतीय सैन्याचे झालेले नुकसान आणि पाकिस्तानला न भूतो न भविष्यती अशी घडवलेली अद्दल याचा सगळा घटनाक्रम सांगून या मोहिमेचे फलित काय आहे हे लक्षात आणून देण्याचा प्रयत्न केला. हे चित्र जर समोर आणले तर भारतीय सैन्याला आपल्या क्षमतेचा केवळ अंदाज आलेला नाही तर भारताकडे यापेक्षाही प्रचंड मोठी क्षमता आहे. १४ लाखांचे प्रत्यक्ष सैन्य आणि इतर राखीव दलांचा विचार केला तर आज भारताकडे १७ ते १८ लाखांचे सैन्य कुठल्याही प्रसंगाला तोंड देण्यासाठी उपलब्ध असते. म्हणजे भारत ही जगातील सर्वात मोठी सैन्यशक्ती ठरते आणि इतक्या बलाढ्य सैन्य शक्ती समोर पाकिस्तानचा टिकाव लागणे हे कदापि शक्य होण्यासारखे नाही. केवळ अण्वस्त्रांची भीती दाखवून पाकिस्तान भारताला घाबरवण्याचा प्रयत्न करत होता. पण तो भारताने कराची बंदर टार्गेट करण्याचा जेव्हा निर्णय घेतला आणि भवालपूर या ठिकाणी केलेला हल्ला हा पाकिस्तानसाठी खूप अनपेक्षित ठरला. अगदी पाकिस्तानच्या मध्यवर्ती भागात म्हणजे लाहोरसारख्या शहराजवळ घडवून आणलेले हल्ले पाकिस्तानला त्रासदायक ठरले आणि त्यातून ज्या ठिकाणीही पाकिस्तानने आपले अण्वस्त्र साठवून ठेवली आहेत ती ठिकाणेच टार्गेट होऊ शकतील किंवा त्याला धोका पोहोचू शकेल याची भीती वाटू लागली अशी अनधिकृत माहिती समोर आलेली आहे. त्या वृत्तांतामधून या अण्वस्त्रांच्या जवळपास कुठेतरी धोका पोहोचवण्याची सुरुवात झालेली होती आणि त्यातून किरणोत्सर्ग होऊ शकण्याची शक्यता वाटू लागल्याने पाकिस्तान सैन्याने तितक्याच तातडीने शस्त्रसंधीचा प्रस्ताव तयार केला आणि अमेरिकेच्या माध्यमातून भारतापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**अमेरिकेलाही भीती**

भारताला अपेक्षित असे उद्दिष्ट साध्य झाल्याने त्यातही प्रामुख्याने दहशतवादी आणि तिथली प्रमुख ठिकाणे उद्ध्वस्त झाल्याने भारताला या संघर्षामागचा हेतू प्रत्यक्षात आल्याचे समाधान मिळालेलेच होते. परंतु पाकिस्तानचा अनाठायी अहंकार मधून मधून उफाळून येत असल्याने त्याला अद्दल घडवणे तितकेच गरजेचे होते. भारताने केलेला हल्ला आणि त्यात झालेले नुकसान याबद्दलचे सविस्तर वर्णन येत्या काळामध्ये समोर येईलच. परंतु या नुकसानीपेक्षाही भारताने हेतू साध्य केला आणि ज्या कारणासाठी हा संघर्ष केला त्याचे फलित सर्वात महत्त्वाचे ठरते. म्हणूनच सैन्य दलाच्या अधिकाऱ्यांनी किती नुकसान झाले याला महत्त्व दिले नाही. त्याबद्दलचे प्रश्न वारंवार त्यांना विचारले गेले. परंतु त्यांनी अतिशय आत्मविश्वासाने आणि संपूर्ण लक्ष आमचे संघर्षावर केंद्रित होते. जी उद्दिष्ट नक्की केली होती ती सगळी तडीला नेण्यात यश मिळाल्याने ते समाधान अधिक महत्त्वाचे असल्याचे बोलून दाखवले. या सगळ्या प्रकारांचा एकत्रित विचार केला आणि त्याचा जर सारांश काढला तर भारतीय सैन्य दलाचे मनोबल आणि कार्यक्षमता अतिशय बलदंड स्वरूपाची आहे यावर शिक्कामोर्तब सुरू झालेले आहे. विशेष म्हणजे अमेरिकेसारख्या देशालासुद्धा एकाअर्थी भारतपाक संघाचा धाक वाटला होता. एकीकडे युक्रेन रशियाचा संघर्ष दुसरीकडे इस्त्रायल पॅलेस्टाईनचा संघर्ष या दोन्ही ठिकाणी युद्धविराम घडवून आणण्याचा प्रयत्न अमेरिकेने केला. परंतु त्याला यश मिळाले नाही. पाकिस्तानने अमेरिकेपुढे अनेकवेळेला गुडघे टेकलेले आहेत. कर्जासाठीही हात पसरलेले आहेत. स्वाभाविकपणे अमेरिकेची पाकिस्तानविषयीची सहानुभूती आणि दयाबुद्धी त्या देशाबाबत सहाय्यभूत ठरत आली.

**पाकिस्तानही जाणून होता**

आतासुद्धा भारतासारख्या देशापुढे पाकिस्तानचा टिकाव लागणार नाही ही अगदी सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट गोष्ट आहे. अतिशय योजनापूर्वक एकेक टप्पा पुढे जाऊन भारताने एका वेगळ्याच युद्धनीतीची झलकही जगाला दाखवली आहे. युक्रेन, रशिया किंवा इस्त्रायल पॅलेस्टाईन यांच्यातल्या संघर्षाचे स्वरूप आणि भारत-पाकिस्तान संघर्षाचे स्वरूप खूप वेगळे आहे. एवढेच नव्हे तर १९७१ किंवा अगदी कारगिल युद्धाचे स्वरूपसुद्धा यावेळच्या संघर्षापेक्षा खूप वेगळे आहे. प्रत्यक्ष युद्धाची घोषणा न करता परंतु युद्धजन्य परिस्थितीची निर्मिती करून पाकिस्तानला धडकी भरवण्यात भारताला यश आले. आपल्याकडे शस्त्रसज्जता आहे असे म्हणणाऱ्या पाकिस्तानला भारताचा एकही हवाई हल्ला परतवून लावता आलेला नाही. उलट त्यांच्या हवाई पट्ट्या नष्ट करून तितकाच मोठा तडाखा भारताकडून दिला गेला. अण्वस्त्रांचा वापर हे काही ऐऱ्यागैऱ्याचे काम राहिलेले नाही. गेल्या जवळपास ७०-८० वर्षांत अण्वस्त्र वापरण्याबाबत सगळ्या जगानेच दाखवलेला संयम महत्त्वपूर्ण ठरला आहे. अण्वस्त्र ही केवळ शांतता ठेवण्यासाठीचीच एक ग्वाही ठरलेली आहे. त्याचा वापर करण्याचा प्रयत्न हा सर्वात मोठा नादानपणा मानला जातो. असा नादानपणा पाकिस्तान करणार नाही याची अमेरिकेलाही खात्री वाटत होती. अर्थातच पाकिस्तानदेखील आपला पाय आणखी खोलात जाऊ नये याची काळजी घेत होता. जीवित किंवा वित्तहानी न करता सामान्य नागरिकांची काळजी घेत भारताने केलेले हवाई हल्ले भारतीय सैन्य दलाच्या युद्धनीतीचा एक आगळावेगळा आविष्कार ठरलेला आहे.

**सुविचार**

विलास कोळेकर
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

**अनुभव हा कधी मोफत मिळत नसतो.**
**त्यासाठी कधी वेळ, कधी किंमत तर कधी आयुष्य खर्च करावे लागते.**

**पंचांग**

मंगळवार, १३ मे, २०२५
शक १९४७ विश्वावसुनामसंवत्सर

नक्षत्र : विशाखा

रवी उदय- ०६-०६
रवी अस्त- १९-०४

-: जन्मराशी :-
००-०१ ते ०२-२६ तूळ
०२-२७ ते २४-०० वृश्चिक

नारद जयंती (वीणादान)

मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)
संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः navakal.1923@gmail.com
**REGD. No. MAHMAR/2021/81075**

Printed and Published by **Rohit Ramakant Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती

# गुलाब जामुन कस्टर्ड



**साहित्य -** दूध, कस्टर्ड पावडर-२५ ग्रॅम, साखर-११० ग्रॅम, वेलचीचे दाणे

**कृती -** सर्वात आधी एका भांड्यात ८० मिली दूध आणि २५ ग्रॅम कस्टर्ड पावडर घाला आणि चांगले मिसळा. नंतर ते एका बाजूला ठेवा. आता पॅनमध्ये एक लिटर दूध घाला आणि ते गरम करा. नंतर त्यात तयार केलेले कस्टर्ड मिक्स करा. ढवळून मंद आचेवर ते घट्ट होईपर्यंत शिजवा. तसेच साखर आणि वेलचीचे दाणे घाला चांगले मिसळा आणि १ तासासाठी फ्रीजमध्ये ठेवा. आता तयार कस्टर्ड एका बाऊलमध्ये काढा व त्यात गुलाब जामून घाला. तर चला तयार आहे आपली गुलाब जामुन कस्टर्ड रेसिपी, थंडगार नक्कीच सर्व्ह करा.



# कोहलीच्या निवृत्तीमुळे चाहत्यांना धक्का

## कसोटी क्रिकेटमधील यशस्वी कर्णधार ठरला

**भारतीय फलंदाज विराट कोहलीने कसोटी क्रिकेटला रामराम ठोकल्यामुळे चाहत्यांना एकच धक्का बसला. तो कसोटी क्रिकेटमधील यशस्वी कर्णधार ठरला होता. त्याने १२३ कसोटीत ४६.८५ सरासरीसह ९२३० धावा ठोकल्या. त्यात त्याच्या ३० शतकांचा समावेश आहे. कसोटीमध्ये सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत कोहली १९ व्या क्रमांकावर विराजमान आहे आणि सर्वाधिक विराट धावा करणारा चौथा भारतीय फलंदाज आहे.**

■ नवी दिल्ली

**त्याने** २० जून २०११ रोजी किंग्स्टन येथे वेस्ट इंडिजविरुद्ध कसोटी सामन्यात पदार्पण केले. त्याने त्याच्या १४ वर्षांच्या कारकिर्दीत अनेक चढ-उतार पाहिले असून, तो त्यातून सहीसलामत उभा राहिला. त्याने २०१४ ते २०२२ पर्यंत कसोटी सामन्यांमध्ये भारतीय संघाची धुरा सांभाळली. त्याच्या कसोटी कारकिर्दीत त्याने अनेक विक्रमही आपल्या नावावर नोंदवले. त्याने कोहली हा ६००० धावा करणारा ९ वा आणि ७००० धावा करणारा ५ वा सर्वात जलद फलंदाज ठरला. कसोटी कर्णधार म्हणून विराट सर्वाधिक धावा करणारा भारतीय खेळाडू ठरला आहे. त्याच्या नेतृत्वात २०१८-१९ मध्ये पहिल्यांदाच ऑस्ट्रेलियात कसोटी मालिका जिंकली. २०२१ मध्ये भारताने जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम फेरीत देखील प्रवेश केला. कर्णधार म्हणून त्याने ६८ पैकी ४० सामने जिंकून दाखवले. यात त्याने कॅप्टनकूल महेंद्रसिंग धोनीलाही मागे टाकले. विराटने कसोटी संघाचा कर्णधार म्हणून सलग सर्वाधिक ९ कसोटी मालिका जिंकल्या. कर्णधार म्हणून कसोटीत त्याने सर्वाधिक ५८६४ धावा केल्या.

विराट २०१२, २०१५, २०१६, २०१८ आणि २०२३ या वर्षांमध्ये एका कॅलेंडर वर्षात सर्वाधिक धावा करणारा भारतीय फलंदाज आहे. २०१९ मध्ये दक्षिण आफ्रिकेविरूद्ध विराटने नाबाद २५४ धावांची जबरदस्त खेळी केली होती. एका सामन्यात भारतीय कर्णधाराने नोंदवलेली ही सर्वोच्च वैयक्तिक धावसंख्या आहे.

त्याने भारतासाठी सर्वाधिक ७ द्विशतके झळकावली. त्याने सलग ४ मालिकांमध्ये सलग द्विशतके झळकावली आहेत. अशी कामगिरी करणारा तो एकमेव भारतीय फलंदाज आहे. आयसीसीच्या कसोटी फलंदाज क्रमवारीत २०१८ मध्ये विराटने एकूण ९३४ गुण मिळवले होते. कोणत्याही भारतीय फलंदाजाने मिळवलेले हे सर्वाधिक गुण आहेत. यापूर्वी भारताच्या सचिन तेंडुलकरचे ८८७ गुण होते. अनेक वर्षे क्रिकेटवर राज्य करणाऱ्या बलाढ्य ऑस्ट्रेलिया संघाविरूद्ध विराट कोहलीने ७ शतके झळकावली. कसोटीच्या दोन्ही डावांत शतके ठोकण्याचा विक्रम विराटच्या नावावर आहे. २०१४ मध्ये त्याने ऑस्ट्रेलियाविरुद्ध ॲडलेड येथे कसोटीत पहिल्या डावात ११५ आणि दुसऱ्या डावात १४१ धावा केल्या होत्या. कोहलीशिवाय विजय हजारे, सुनील गावस्कर, राहुल द्रविड, अजिंक्य रहाणे आणि रोहित शर्मा या भारतीयांनीही अशी कामगिरी केली आहे.

कसोटीच्या एका डावात शतक आणि दुसऱ्या डावात ९०च्या घरात बाद झालेल्या खेळाडूंपैकी विराट कोहली आहे. त्याच्यासोबत हे दोनदा घडले आहे. २०१३ मध्ये कोहलीने जोहान्सबर्ग येथे दक्षिण आफ्रिकेविरुद्ध पहिल्या डावात ११९ धावा केल्या होत्या, तर दुसऱ्या डावात ९६वर तो बाद झाला होता. तर २०१८ मध्ये नॉटिंगहॅम येथे इंग्लंडविरुद्ध पहिल्या डावात ९७ धावांवर तो बाद झाला आणि दुसऱ्या डावात त्याने १०३ धावा केल्या होत्या. कोहलीशिवाय या यादीत चंदू बोर्डे, मोहिंदर अमरनाथ, सौरव गांगुली, गौतम गंभीर आणि चेतेश्वर पुजारा या भारतीयांचा समावेश आहे.



# घाटकोपर केंद्राचा ठाणे केंद्रावर विजय! श्लोक कडव याची हॅट्ट्रिक

■ मुंबई

**घाटकोपर** केंद्राचा ऑफस्पिनर श्लोक कडव याने घेतलेली हॅट्ट्रिक आणि दुसऱ्या डावात विहान जोबनपुत्रने टिपलेल्या ६ बळींच्या जोरावर घाटकोपर केंद्राने ठाणे केंद्रावर शानदार विजय नोंदवला. ३३ व्या एलआयसी एमसीए कल्पेश गोविंद कोळी स्मृति चषक क्रिकेट स्पर्धेच्या पहिल्याच सामन्यात ठाणे केंद्र ब संघाला पहिल्या डावात १२२ आणि दुसऱ्या डावात ८८ धावांवर रोखल्यानंतर घाटकोपर केंद्राने पहिल्या डावात १९९ आणि नंतर बिनबाद १२ धावा करत विजयाची नोंद केली.

घाटकोपर केंद्राकडून आयुष शेटेने पहिल्या डावात ६० तर ऋषभ सदके (३३) आणि रुशन फारुकी (३२) यांनी मोलाचे योगदान दिले. ठाणे केंद्राच्या सिद्धांत काशिकेदारने पहिल्या डावात ४२ धावांत ६ विकेट्स टिपले. अन्य सामन्यांत माटुंगा जिमखान्यावर झालेल्या सामन्यात सोहम कांगणे याने दुसऱ्या डावात नाबाद १०० धावांची खेळी साकारली असली तरी त्याच्या भिवंडी व वांगणी केंद्राला पहिल्या डावातील पिछाडीच्या बळावर पराभव पत्करावा लागला. भिवंडी-वांगणी केंद्राचा पहिला डाव १३९ धावांवर संपुष्टात आला होता. त्यानंतर माटुंगा केंद्राने प्रचित आमकर (६४), यश चौहान (५५), देवाशिष घोडके (४०) यांच्या दमदार फलंदाजीच्या जोरावर २३५ धावा करत पहिल्या डावात ९६ धावांची आघाडी घेतली होती. अ गटात एमसीए अकादमी ब केंद्राने कल्याण केंद्रावर विजय साकारला. कल्याण केंद्राला पहिल्या डावात १३९ धावांवर रोखल्यानंतर एमसीए ब संघाने विराट यादवच्या ४० धावांच्या खेळीमुळे १९५ धावा केल्या होत्या. त्यानंतर विराट यादवचे ५ बळी तसेच नारायण ठाकूरच्या ५ विकेट्सच्या जोरावर कल्याण केंद्राला ११४ धावांवर गारद केले. विजयासाठी ठेवलेले ५९ धावांचे लक्ष्य एमसीए ब संघाने २ विकेट्स गमावून सहज पार केले.

शॉन कोरगावकर याने अष्टपैलू कामगिरी (७८ धावा आणि ६० धावांत ५ विकेट्स) साकारली तरी आझाद मैदान केंद्राला पहिल्या डावातील पिछाडीच्या बळावर पराभव पत्करावा लागला. अजित शुक्लाचे ५ आणि सुधन सुंदरराजचे ३ बळी यामुळे वाशी केंद्राने आझाद मैदान केंद्राचा पहिला डाव २०५ धावांवर संपुष्टात आणला.



**स्पेनच्या पाल्मा येथे झालेल्या केटलबेल चॅम्पियनशिप ट्रॉफी स्पर्धेत मुंबईतील माझगाव-ताडवाडीच्या नीरव गिरीश कोळीने भारतासाठी रौप्यपदक पटकाविले.**

# सूर्यवंशी क्षत्रिय समाजाच्या क्रीडा महोत्सवाला सुरवात



मुंबई -सूर्यवंशी क्षत्रिय ज्ञाती समाजाच्या क्रीडा महोत्सवाला दादर येथील सूर्यवंशी क्षत्रिय सभागृहात शनिवार १० मे पासून सुरवात झाली. या महोत्सवाचे उद्घाटन जागतिक स्तरावरील मार्शल आर्टचे ब्लॅक बेल्ट प्राप्त खेळाडू हार्दिक पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी मंडळ विश्वस्त जयंत पाटील,दत्तात्रय दळवी उपस्थित होते. या क्रीडा महोत्सवामध्ये लहान वयोगटासह वृद्ध वयोगटातील खेळाडूंसाठी वेगवेगळ्या क्रीडा प्रकारांचे आयोजन केले आहे. यामध्ये बुद्धिबळ, कॅरम या खेळांचा समावेश आहे.

# राज्य अजिंक्यपद कॅरम स्पर्धेमध्ये मूंबई संघाचा डबल धमाका

■ नवी मुंबई




**नवी मुंबई** स्पोर्ट्स असोसिएशन आयोजित ५९ व्या सीनियर राज्य अजिंक्यपद कॅरम स्पर्धेच्या पुरुष गटाच्या सांघिक विभागात मुंबई संघाने पुण्याच्या संघावर २-१ असा विजय मिळवून या गटाचे विजेतेपद पटकाविले. पहिल्या एकेरीच्या सामन्यात मुंबईच्या महम्मद घुफ्रानने पुण्याच्या सागर वाघमारेवर २५-०, २४-१० असा तर दुसऱ्या एकेरीच्या सामन्यात मुंबईच्या प्रशांत मोरेने पुण्याच्या अभिजित त्रिपनकरला २५-११, १७-१६ असे हरवून आपल्या संघाला विजय मिळवून दिला.तिसऱ्या आणि दुहेरीच्या सामन्यात पुण्याने एक गुण मिळवताना त्यांच्या अनिल मुंढे व रहीम खान जोडीने मुंबईच्या राहुल सोळंकी व सिद्धांत वाडवलकर जोडीवर १८-३, २४-८ असा विजय मिळवला खरा. पण त्यांची झुंज एकाकी ठरली. पुरुष व महिला अशा दोनही गटात यावर्षी मुंबईचा संघ विजेता ठरला. तिसऱ्या क्रमांकासाठी झालेल्या लढतीत ठाण्याने मुंबई उपनगरला ३-० असा एकतर्फी विजय नोंदविला. ठाण्याच्या पंकज पवारने मुंबई उपनगरच्या संजय मणियारला २०-१३, २५-१६ असे तर झैद अहमद फारुकीने मुंबई उपनगरच्या सज्जाद शेखला २५-३, २२-१ असे नमविले. दुहेरीच्या लढतीत ठाण्याच्या महम्मद अंसारी व समीर अंसारी जोडीने मुंबई उपनगरच्या मंगेश पंडित व मुनेश राजा जोडीला २५-८, २५-२२ असे हरवले. आतापर्यंत स्पर्धेत एकंदर १७ व्हाईट स्लॅम व ५ ब्लॅक स्लॅमची नोंद करण्यात आली आहे.

भारताच्या एअरस्ट्राईकनंतर आपल्या देशातील जनतेमधील प्रतिमा टिकवण्यासाठी पाकिस्तानच्या लष्कराला भारताविरुद्ध कारवाई करणे अपरिहार्य होते. पण या कारवाईला भारताच्या अत्याधुनिक शस्त्रसामग्रीने आणि लष्कराच्या अचूक नियोजनामुळे पूर्णतः निष्प्रभ करण्यात आले. पाकिस्तानची क्षेपणास्त्रे, ड्रोन्स हवेतच उद्ध्वस्त करण्यात आली. एक विमान पाडण्यात आले. यावरुन पाकिस्तानला योग्य तो संदेश गेलेला असावा. काही अभ्यासकांच्या मते, ही लढाई खूप दीर्घकाळ चालणारी आहे. पण मागील तीन युद्धांप्रमाणेच याही वेळी भारत पाकिस्तानला धडा शिकवेल यात शंका नाही. पण यावेळी असा वज्राघात केला पाहिजे की, पाकिस्तानची पुन्हा हिंमत होणार नाही.

# आता गरज वज्राघाताची!

दहशतवाद्यांवर केलेल्या एअरस्ट्राईकनंतर पाकिस्तान काही ना काही हालचाल करणारच, याबाबतचे अंदाज वर्तवले जात होते. वास्तविक, भारताने केवळ दहशतवादी पायाभूत रचनांवरच हल्ला केला होता. परंतु पाकिस्तानकडे असे विशिष्ट लक्ष्य नसल्याने त्याने भारतातील लष्करी ठिकाणांना आणि सर्वसामान्य नागरिकांना लक्ष्य करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. संरक्षण मंत्रालयाच्या माहितीनुसार, पाकिस्तानने भारताच्या उत्तर आणि पश्चिमेकडील १५ शहरांतील अनेक लष्करी ठिकाणांवर क्षेपणास्त्र आणि ड्रोनद्वारे हल्ला करण्याचा प्रयत्न केला, मात्र भारतीय लष्कराने तो यशस्वीरित्या उधळून लावला. उलट या कारवाईच्या प्रत्युत्तरादाखल, भारताने पाकिस्तानच्या हवाई संरक्षण नेटवर्क पूर्णतः बेचिराख करून आपली क्षमता व अत्याधुनिकता दाखवून दिली.



सीमारेषेवर गोळीबार करणे हा पाकिस्तानकडे उरलेला एकमेव पर्याय आहे आणि याचा वापर सध्या पाकिस्तान करत आहे. भारतीय नागरिकांना लक्ष्य करण्यामागे पाकिस्तानची खुमखुमी दिसत आहे; मात्र, त्याला देखील भारताने योग्य प्रतिसाद दिला आहे. आता प्रश्न असा निर्माण होतो की, या सर्व माऱ्यांच्या माध्यमातून पाकिस्तानला पूर्ण युद्धाकडे जायचे आहे का? पण प्रत्यक्षात पूर्ण युद्धासाठी पाकिस्तान तयार आहे, असे दिसत नाही. तसेच पाकिस्तानला याची पूर्ण कल्पना आली आहे की, आपण आक्रमकता दाखवली, तर भारताकडून त्याला शतप्रतिशत कठोर प्रत्युत्तर देण्यास सक्षम आहे. पाकिस्तानकडून डागली गेलेली क्षेपणास्त्रे, ड्रोन, विमाने या सर्वांना हवेतच उडवून देऊन भारताने योग्य तो संदेश दिला आहे.

भारताची सैन्य क्षमता पाकिस्तानपेक्षा निश्चितपणाने अधिक आहे. सैनिकांची संख्या, तंत्रज्ञान किंवा लष्करी उपकरणांची तुलना केली, तर भारत पाकिस्तानपेक्षा बऱ्याच पुढे निघून गेलेला आहे. केवळ लढाऊ विमानांच्या संख्येतच नव्हे, तर प्रगत आणि आधुनिक विमानांच्या बाबतीतसुद्धा भारत सरस आहे. तसेच, भारताला आंतरराष्ट्रीय समुदायाचे अधिक समर्थन आहे. त्यामुळे पाकिस्तानने सध्या सुरु असलेले हल्ले वेळीच थांबवले नाहीत, तर त्याला गंभीर परिणामांना सामोरे जावे लागेल.

जागतिक समुदाय दोन्ही देशांदरम्यान तणाव कमी करण्याचा सतत प्रयत्न करत आहे. भारत आणि पाकिस्तान दोघेही अण्वस्त्र सुसज्ज राष्ट्रे असल्यामुळे, रशिया–युक्रेन युद्ध आणि इस्रायल–हमास संघर्षाच्या पार्श्वभूमीवर, दक्षिण आशियामध्ये नवे युद्धसदृश वातावरण निर्माण होऊ नये, असे जगाला वाटते. भारताची प्रतिमा एक जबाबदार देश म्हणून उभी राहिली आहे. ऑपरेशन सिंदूरची माहिती देताना आपण स्पष्ट केले होते की ही कारवाई लक्ष्यित असून भारत तणाव वाढविण्याच्या बाजूने नाही. परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी इराणमध्ये बोलतानाही हीच भूमिका स्पष्टपणे मांडली. पण पाकिस्तानच्या वर्तनातून तणाव वाढविण्याचा कल स्पष्टपणाने उजागर होत आहे. अशावेळी परराष्ट्रमंत्री जयशंकर यांचे विधान अत्यंत महत्त्वाचे ठरते की, भारतावर हल्ला झाला, तर अत्यंत कठोर प्रत्युत्तर दिले जाईल.

या साऱ्या घडामोडीत काही बाबी ठळकपणे स्पष्ट होतात. पहिली म्हणजे, भारताने पुन्हा एकदा पाकिस्तानला स्पष्ट संदेश देत लक्ष्मणरेषा आखली आहे. परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांच्या शब्दांत सांगायचे, तर न्याय मिळविण्यासाठी केलेली ही कारवाई पहलगाम हल्ल्याच्या भावनिक उद्वेगातून केलेली नव्हती तर लष्करी आणि लष्करबाह्य पातळीवरील सखोल विचार करुन केलेली होती.

ऑपरेशन सिंदूर हे २०१६ च्या सर्जिकल स्ट्राईक आणि २०१९ च्या बालाकोट एअर स्ट्राईकपेक्षा अनेक पटींनी प्रगत होते. कारण लक्ष्यांची संख्या अधिक होती, ती विविध प्रकारची होती. पाकिस्तानच्या सीमा ओलांडून सुमारे १५० किमी आतमध्ये आपण त्यांना ठोकले. या कारवाईत २४ प्रकारच्या क्षेपणास्त्रांचा वापर करण्यात आल्यामुळे परिणाम अधिक व्यापक झाला. यातून भारत आपल्या सार्वभौमत्वाच्या रक्षणासाठी समर्थ आहे, हे जगाला कळून चुकले. ऑपरेशन सिंदूर ही एक संयुक्त मोहीम होती. सरकारने स्पष्ट केले आहे की ही मोहीम अजूनही सुरू आहे, याचा अर्थ सहभागी संस्थांमध्ये सुसूत्रता आहे.

■ विजया पंडित

राफेल लढाऊ विमानांचा वापर, स्काल्प आणि हॅमरसारख्या अत्याधुनिक क्षेपणास्त्रांचा वापर, ड्रोन आणि बॉम्बगोळ्यांचा मारा, तसेच मानवविरहित हवाई साधनांद्वारे हल्ला करणे, त्यानंतर लगेचच तंतोतंत आणि रिअल टाईम माहिती मिळवणे व त्यावर प्रक्रिया करणे या सर्वांमधून भारताची क्षमता आता पूर्वीपेक्षा वेगळी आणि अधिक विकसित झाली आहे, हे पाकिस्तानने समजून घ्यायला हवे.

तिसरी बाब, मनोवैज्ञानिक युद्धातही भारताने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. कारण देशातून जनमताचा मोठा दबाव असूनही सरकारने संयम ठेवला. पाकिस्तानवर दबाव टाकण्यासाठी लष्कराला सज्जतेचा आदेश देण्यात आला होता. पण योग्य वेळ आल्यावरच कारवाई केली गेली. पाकिस्तानच्या अंतर्गत सुरक्षेची स्थिती आणि त्याची आर्थिक दुर्दशा लक्षात घेता, हा तणाव फार काळ टिकणार नाही.

आणखी एक बाब म्हणजे, पहलगाम प्रकरणाबाबत आंतरराष्ट्रीय समुदायाला वेळोवेळी माहिती देण्याची भारताची कूटनीतिक भूमिका यशस्वी ठरली आहे. चीन आणि तुर्की या काही देशांना वगळता, बहुतांश प्रभावी देशांनी भारताला पाठिंबा दिला आहे. हे धोरण भविष्यातील तणाव कमी करण्यात पुन्हा उपयुक्त ठरू शकते.

आता प्रश्न आहे पुढे काय? सर्वप्रथम पाकिस्तानने धर्मांध कट्टरतेच्या दिशेने वळणाऱ्या देशांतर्गत चर्चा थांबवायला हव्यात. आज सोशल मीडियावर या चर्चांना वेगळे वळण मिळत असल्याचे स्पष्ट दिसत आहे. शांततेचा विचार करता या संघर्षाची सुरुवात पाकिस्तानने केली असल्याने भारताने मागे पाऊल घेण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. पण जागतिक समुदायाने दबाव आणला नाही तर पाकिस्तानला रोखणार कोण? याचे उत्तर सुस्पष्ट आहे आणि ते म्हणजे भारताचे कठोर प्रत्युत्तर. एस ४०० प्रणालीने पाकिस्तानची सर्व क्षेपणास्त्रे, ड्रोन निष्प्रभ ठरले आहेत. याउलट चिनी बनावटीच्या लष्करी सामग्रीला हातोहात चकवा देत भारत पाकिस्तानला योग्य प्रकारे कमकुवत करत चालला आहे. काही अभ्यासकांच्या मते, ही लढाई खूप दीर्घकाळ चालणारी आहे. पण मागील तीन युद्धांप्रमाणेच याही वेळी भारत पाकिस्तानला धडा शिकवेल यात शंका नाही. पण यावेळी असा वज्राघात केला पाहिजे की, पाकिस्तानची पुन्हा हिंमत होणार नाही. याबाबतचे नियोजन लष्कराने केलेलेही असेल. कदाचित येणाऱ्या काळात ८ मेप्रमाणे एखादा आश्चर्याचा सुखद धक्का भारतीयांना बसू शकतो.

# बालीच्या सहलीत शिक्षिकेचा राफ्टिंग करताना अपघाती मृत्यू

■ ठाणे

**कल्याणमधील** बी. के. बिर्ला शाळेतील विद्यार्थी, शिक्षिकांसोबत सहलीला गेलेल्या श्वेता पाठक या शिक्षिकेचा राफ्टिंग करताना अपघाती मृत्यू झाला. शनिवार १० मे रोजी श्वेता यांचा बाली येथे मृत्यू झाल्याची माहिती भारतातील शाळा, संस्था व नातेवाईकांना समजली. या महिला शिक्षिकेच्या मृत्यूमुळे विद्यार्थी आणि पालकांनी हळहळ व्यक्त केली. आज या महिला शिक्षिकेचे पार्थिव कल्याण येथे आणण्यात आले.

बी. के. बिर्ला शाळेची सहल मौजमजेसाठी बालीला गेली होती.एका पर्यटन कंपनीच्या माध्यमातून शाळेने या सहलीचे नियोजन केले होते. या सहलीत श्वेता पाठक, त्यांचे पती पुष्कर पाठक, बी. के. बिर्ला शाळेच्या मुख्याध्यापिका



रंजना जांग्रा, इतर शिक्षक व १६ विद्यार्थी होते. या संदर्भात शाळेने अधिकृत वेबसाईटवर निवेदन जारी केले आहे. त्यात असे आवाहन केले की, शाळेसाठी पाठक यांचे एका शिक्षिकेपेक्षा अधिक महत्त्व होते. कृपया त्यांच्या कुटुंबाच्या गोपनीयतेचा आदर करुन कोणतीही संदिग्ध माहिती पसरवू नये.

याप्रकरणी राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी एक्सवरुन पाठक यांचे पार्थिव इंडोनेशियाहून भारतात आणण्यासाठी परराष्ट्र मंत्रालय आणि जकार्ता भारतीय दूतावासाकडून मदत मागितली होती.

# जोधपूर रेल्वे स्थानक उडवण्याची धमकी

■ जयपूर

**राजस्थानमधील** जोधपूर पोलीस नियंत्रण कक्षाला फोन करुन जोधपूर रेल्वे स्थानकाला बॉम्बने उडवण्याची धमकी देणाऱ्याला पोलिसांनी अटक केली आहे. श्याम यादव (४३) असे अटक केलेल्या इसमाचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, श्याम यादव हा उत्तर प्रदेशातील जौनपूर जिल्ह्यातील आसपूर गावचा रहिवासी असून, सध्या जोधपूरमध्ये वास्तव्यास आहे. तो केटरिंग व्यवसायात कार्यरत आहे. आज सकाळी ७ वाजताच्या सुमारास त्याने जोधपूर पोलीस नियंत्रण कक्षाला फोन करुन सांगितले की, मी रेल्वे स्टेशनवर बॉम्ब ठेवला आहे, शक्य असेल तर मला शोधून दाखवा. या धमकीनंतर पोलिसांनी तातडीने जोधपूर आणि पाली येथील जीआरपी व आरपीएफच्या मदतीने संयुक्त शोधमोहीम राबवली. काही तासांतच आरोपीला पाली रेल्वे स्थानकावरून अटक करण्यात आली.

# अफगाणिस्तानमध्ये बुद्धिबळावर बंदी

■ काबुल

**अफगाणिस्तानमधील** सत्ताधारी तालिबानींनी देशात बुद्धिबळ खेळावर बंदी घातली आहे. शरीयत कायद्यात व इस्लाममध्ये बुद्धिबळ खेळणे हे जुगार खेळण्यासारखे असल्यामुळे ही बंदी घातल्याचे त्यांनी म्हटले आहे. बुद्धिबळ खेळावर बंदी घालताना तालिबानी प्रशासनाने म्हटले आहे की, हा खेळ आमच्या तात्विक कायद्यांच्या विरोधात आहे.शरीयत कायद्यातही बुद्धिबळाला जुगार म्हटले आहे. बुद्धिबळ खेळाला धार्मिक मान्यता नसल्याकारणाने ही बंदी घातली असून यातील काही नियमांचे पुनर्वालोकन करेपर्यंत अफगाणिस्तानात कोणालाही बुद्धिबळ खेळता येणार नाही.

अनेक इस्लामी देशांमध्ये बुद्धिबळ खेळला जातो. काही देशांचे खेळाडू आंतरराष्ट्रीय स्पर्धामध्येही चमकत असताना, अफगाणिस्तान मधील बुद्धिबळावर टाकलेल्या या बंदीबद्दल काहींनी नाराजी व्यक्त केली आहे. या निर्णयाचा फटका अफगाणिस्तानमधील काही कॅफेंना बसणार आहे. इथे चहा घेताना बुद्धिबळाचे डाव खेळण्याची पद्धत आहे. तालिबानी प्रशासनाने या आधीही अनेक खेळांवर बंदी घातली आहे.

# मोतीलाल नगरातील वाढीव बांधकामांमुळे म्हाडाची कोंडी

■ मुंबई

**गोरेगावमधील** मोतीलाल नगराचा अदानी कंपनीकडून पुनर्विकास केला जाणार आहे, असे असताना या ठिकाणी होणारी तीन ते चार मजली वाढीव बांधकामांनी म्हाडासमोर पेच निर्माण केला आहे. अशा वाढीव बांधकामांवर तोडक कारवाई करावी की नाही? असे विचारणा करणारे पत्र राज्य शासनाला पाठविण्यात आले आहे. यामुळे सध्या आम्ही




शासन निर्णय येण्याची वाट पहात आहोत, अशी माहिती म्हाडाच्या अतिक्रमण निष्कासन विभागातून देण्यात आली. मोतीलाल नगर संपूर्ण म्हाडाच्या मालकीच्या जागेवर उभे आहे. येथे होणाऱ्या वाढीव बेकायदा बांधकामांवर अतिक्रमण निष्कासन विभागाकडून तोडक कारवाई केली जाते. आता मोतीलाल नगर पुनर्विकासासाठी अदानीकडे गेले आहे. त्यामुळे वाढीव बांधकामांवर कारवाई करायची की नाही? अशी म्हाडाची कोंडी झाली आहे.आतापर्यंत ९५ बेकायदा बांधकामाची यादी आमच्या विभागाकडे तयार आहे. यावर काय निर्णय घ्यावयाचा हे शासनाने ठरवून म्हाडाला कळवावे. यासाठी शासनाकडे पत्रव्यवहार करण्यात आल्याची माहिती अतिक्रमण निष्कासन एका विभागातून एका अधिकाऱ्याने दिली.

# मरू, पण गाव सोडणार नाही गुजरातच्या गावाचा निर्धार

■ अहमदाबाद

**भारतीय** वायुदलाच्या ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तानकडून ८ मेपासून भारतीय हद्दीत क्षेपणास्त्र व ड्रोनद्वारे हल्ले सुरू झाले आहेत. जम्मू-काश्मीर, राजस्थान, गुजरात आणि पंजाब या राज्यांतील सीमावर्ती भागांना या हल्ल्यांची झळ बसत आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने सीमेलगतच्या गावांना तातडीने रिकामे करण्याचे आदेश दिले. मात्र, गुजरातमधील काशीवाडमा या गावाने सरकारच्या आदेश न जुमानण्याचे ठरवले आहे. हे गाव सीमेपासून केवळ ५० मीटर अंतरावर असूनही येथील ग्रामस्थांनी आपली घरे सोडण्यास स्पष्ट नकार दिला आहे. गावकऱ्यांनी ठामपणे सांगितले की, जर आपल्याला मरावे लागलेच, तर ते गोळी लागून मरू. एक दिवस मरण येणारच आहे, मग त्याला घाबरायचे कशाला? पण आम्ही आमचे घर सोडणार नाही. आम्ही आमच्या सुरक्षेसाठी स्वतःची व्यवस्था केली आहे. आम्ही कच्चे बंकर बांधले आहेत. रात्री धोका असल्यास किंवा गोळीबार झाल्यास, सर्व जण बंकरमध्ये जातो.

# सापाचे विष काढण्याप्रकरणी युट्युबरची अलाहाबाद उच्च न्यायालयाने याचिका फेटाळली

■ मुंबई

**अनेक** रेव्ह पार्ट्या, सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये विषारी सापाचे विष काढून दाखवणाऱ्या व नंतर त्याचे व्हिडीओ युट्युबवर टाकणाऱ्या एल्विश यादव याची याचिका अलाहाबाद उच्च न्यायालयाने फेटाळली. आपल्यावर दाखल आरोपपत्राला त्याने न्यायालयात आव्हान दिले होते. अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सौरभ श्रीवास्तव यांनी गाजियाबाद



न्यायालयाचे समन्स रद्द करण्याला नकार दिला आहे. नोव्हेंबर २०२३ मध्ये एल्विश यादव याच्या विरोधात एका प्राणीप्रेमी संस्थेच्या पदाधिकाऱ्याने तक्रार दाखल केली होती. या कार्यक्रमात एल्विशने सापाचे विष काढून दाखवले होते. त्यावर अनेक कलमांखाली गुन्हे नोंदवण्यात आले. गाजियाबाद न्यायालयाने त्याच्यावर समन्स बजावले होते. एल्विश यादवने न्यायालयात दावा केला आहे की, त्याच्या विरोधात तक्रार करणारी व्यक्ती वन अधिकारी नसल्याने त्याची तक्रार ग्राह्य धरू नये. न्यायालयाने त्याचा हा युक्तिवाद फेटाळला.

**TENDER NOTICE**

Sealed item rate tenders are invited from reputed contractors for necessary civil & structural repair, plumbing, waterproofing, painting & allied works of

**UCO BANK EMPLOYEES 'DARPAN' CHS LTD.**

Situated at Off Veera Desai Road, Azad Nagar, Andheri (W), Mumbai - 400053.

Tender forms can be collected from the office of PMC, **PENTACLE ENGINEERS LLP.** located at **Kaliandas Udyog Bhavan Premises CSL**, 154, First Floor, Near Croma Showroom, Near Century Bazar, Prabhadevi, Mumbai - 400025

Tel: 9324348040

From 13.05.25 to 20.05.25

Between 10.30 AM to 6.00 PM

Last date of submission: 21.05.25

Between 4.00 PM to 6.00 PM at Society Office.

**Cost of Tender:**

**Rs. 7,000/- (Non - Refundable)**

**सूचना**

येथे सूचना देण्यात येत आहे की मी सॉलिटेअर को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड ("**उक्त सोसायटी**") च्या २००५-०६ चा नोंदणी क्रमांक BOM/WHW/HSG/TC/12879 आणि ८०, एस व्ही रोड, सांताक्रूझ (पश्चिम), मुंबई- ४०००५४ येथील पत्ता असलेल्या मालमत्तेच्या मालकीची चौकशी करत आहे, येथे दिलेल्या अनुसूचीमध्ये तिचे अधिक स्पष्टपणे वर्णन केले आहे ("**उक्त मालमत्ता**").

अशा सर्व व्यक्ती/संस्था ज्या सदर मालमत्तेत, त्याच्या कोणत्याही भागात किंवा त्याच्या कोणत्याही हिश्श्यात, किंवा बाहेर, वाटप, विक्री, हस्तांतरण, नियुक्ती, देवाणघेवाण, शुल्क, भार, भाडेपट्टा, उप-भाडेपट्टा परवाना, गहाणखत, काळजी घेणाऱ्याचा आधार, वारसा, व्यवसाय, ताबा, हिस्सा, भेटवस्तू, निधन, धारणाधिकार, देखभाल, मृत्युपत्र, उत्तराधिकार, सुविधा, ट्रस्ट, देणगी, करार किंवा अट, ताबा, सुविधा, सुटका, त्याग, किंवा इतर कोणत्याही पद्धतीने कोणत्याही वाटप पत्र, करार, करार, दस्ताऐवज, लेखन, हस्तांतरण करार, योजना, कुटुंब व्यवस्था/तोडगा, खटला, कोणत्याही न्यायालय किंवा न्यायाधिकरणाचा किंवा महसूल किंवा वैधानिक प्राधिकरणाचा आदेश किंवा आदेश, मध्यस्थी निवाडा, किंवा विकास अधिकार किंवा एफएसआय/टीडीआर वापर, करार / करार, भार, किंवा अन्यथा कोणत्याही स्वरूपाचा असो, असा कोणताही हिस्सा, हक्क, मालकी हक्क, मालमत्ता, हितसंबंध, दावा, लाभ, आक्षेप आणि/किंवा मागणी असल्याचा दावा करतात त्या सर्व व्यक्ती/संस्थांना याद्वारे त्याच्या कागद-पत्रांच्या पुराव्यासह माझ्या कार्यालयात, वाय.के. भगवागर अँड कंपनी, डी ब्लॉक, चौथा मजला, शिवसागर इस्टेट, डॉ. ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई ४०० ०१८ येथे स्वाक्षरी करून आणि हे प्रकाशन झाल्या-पासून १४ (चौदा) दिवसांच्या आत लेखी सूचना देणे आवश्यक आहे. त्या आपला दावा mahesh@ykbco.in या ईमेल पत्त्यावर पाठवू शकतात. अन्यथा असा कोणताही हिस्सा, हक्क, मालकी हक्क, लाभ, व्याज, दावा, आक्षेप आणि/किंवा मागणी दुर्लक्षित केली जाईल आणि ती माफ केली गेली आहे आणि/किंवा सोडून दिली आहे असे मानले जाईल.

**उपरोल्लेखित अनुसूची**
**(वरील मालमत्तेचे वर्णन)**

पुढील मालमत्तेचे सर्व भाग व हिस्से, १४६३.७० चौरस मीटरच्या समतुल्य १७५१ चौरस यार्ड आकाराचा ती सर्व जमीन जी नवीन सर्वेक्षण क्रमांक ३७७बी, हिस्सा क्रमांक १ (भाग) आणि ३७७, प्लॉट क्रमांक २ आणि सीटीएस क्रमांक २८८, गाव वांद्रे एच, तालुका अंधेरी, जिल्हा मुंबई उपनगर ("वरील जमीन") असलेल्या जमिनीचा भाग आहे आणि त्यावर "सॉलिटेअर" ("वरील इमारत") म्हणून ओळखली जाणारी इमारत आहे जी एच-वॉर्ड क्र. ३७८१, स्ट्रीट क्रमांक ८०, स्वामी विवेकानंद रोड, सांताक्रूझ (पश्चिम), मुंबई ४०००५४ येथे स्थित आहे. ही जमीन आणि ही इमारत एकत्रितपणे "**वरील मालमत्ता**" म्हणून ओळखली जाते.

**तारीख: आज ११ मे २०२५**

**स्वाक्षरी/-**
**महेश लाड**
**वकिल**
**द्वारा, वाय. के. भगवागर अँड कंपनी,**
डी ब्लॉक, चौथा मजला, शिवसागर इस्टेट, डॉ. ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई- ४०० ०१८

# नाशिकच्या पंचवटीतील जुन्या वाड्याला आग




■ नाशिक

**नाशिकच्या** पंचवटी परिसरात असलेल्या एका जुन्या वाड्याला आज दुपारी अंदाजे १२ वाजताच्या सुमारास अचानक आग लागली. ही घटना पंचवटी कारंजा बस स्टॉपच्या मागील बाजूस असलेल्या रस्त्यावर घडली. हा वाडा पूर्णपणे लाकडी असल्यामुळे आगीने काही क्षणातच रौद्ररूप धारण केले. त्यातच शॉर्ट सर्किट झाल्याने आगीचे मोठे लोळ उठू लागले आणि परिसरात धुराचे लोट पसरले. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या दोन गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. त्यांनी तातडीने कारवाई करत वाड्यात राहणाऱ्या कुटुंबातील सर्व सदस्यांना सुखरूप बाहेर काढले आणि अथक प्रयत्न करून आग नियंत्रणात आणली. सुदैवाने या आगीत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

**भायखळा मार्केट को–ऑपरेटिव्ह प्रिमायसेस सोसा. लि.**

नोंदणी क्र. बी.ओ.एम./डब्ल्यू ई/जी.एन.एल. (ओ.) ३८६/८८-८९
सि.टी. सर्वे क्र. ६७४, ६७४/१, ६७४/२
**जुना भाजीबाजार, डॉ. आंबेडकर रोड, भायखळा,**
**मुंबई - ४०००२७. फोन : २३७८ ०३०४**

**❋ विशेष सर्वसाधारण सभा ❋**
**नोटीस**

**भायखळा मार्केट को-ऑपरेटिव्ह प्रिमायसेस सोसायटी लिमिटेड,** या संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेची विशेष सर्वसाधारण सभा **शुक्रवार दिनांक ३०/०५/२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजता** श्री लखमशी नप्पु हॉल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, व्होल्टास समोर, मुंबई-४०००१२. येथे संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष मा.आमदार **श्री. छगनरावजी चंद्रकांत भुजबळ**, यांच्या मार्गदर्शनाखाली व **चेअरमन मा.श्री. रोहिदास मधुकर लोखंडे** यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली आहे. तरी सर्व सभासदांनी या सभेस वेळेवर आवश्यक उपस्थित रहावे ही विनंती.

**❋ सभेपुढील विषय ❋**

१. संस्थेच्या सभासदांना सभासद कल्याण निधी मधुन सभासदांच्या कुटुंबियांसाठी वार्षिक औषधोपचारासाठी मदत करणेबाबत कार्यकारी मंडळाने घेतलेला निर्णय मा. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्याकडे परवानगी मिळणे संदर्भात त्यांच्याकडुन दिनांक ०४/०२/२०२५ रोजी आलेल्या पत्रावर विचार विनिमय करुन निर्णय घेणे.
२. संस्थेने खरेदी केलेल्या मौजे शिवळे, ता. मुरबाड, जि. ठाणे येथील गट ग्र. ३७७ व ३७९ हि ३११ गुंठे जमीन बिनशेती करण्यात आली आहे. सदर जमीनी बाबत तिथे विकास प्रकल्प राबविणे अथवा संस्थेच्या हिताच्या दृष्टीने सभासदांशी चर्चा करुन पुढील निर्णय घेणे.

**❋ विशेष सुचना ❋**

१. विशेष सर्वसाधारण सभा पुरेशा गणसंख्ये अभावी तहकूब झाल्यास तशी तहकूब झालेली सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी विहित वेळेच्या अर्ध्या तासानंतर भरेल व या सभेस पुरेशी गणसंख्या नसली तरी वरील प्रमाणे कामकाज चालेल.
२. संस्थेच्या वरील विषयांसंदर्भात कोणत्याही सभासदास प्रश्न विचारायचे असल्यास अथवा ठराव मांडावयाचे असल्यास त्याची लेखी सुचना सोमवार ते शनिवार सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत मंगळवार दिनांक २०/०५/२०२५ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत संस्थेच्या कार्यालयात व्यवस्थापकाकडे द्यावेत.
३. या सभेस सुरक्षा नियमाचे पालन करणे आवश्यक राहील.

**❋ आपले नम्र ❋**
**भायखळा मार्केट को-ऑप. प्रिमायसेस सोसायटी लिमिटेड**
**कार्यकारी मंडळाच्या आदेशाने**

| सही/- | सही/- |
|---|---|
| **(श्री. रोहिदास मधुकर लोखंडे)** | **(श्री. शिवाजी विष्णुपंत विधाते)** |
| चेअरमन | सरचिटणीस |

स्थळ : मुंबई
दिनांक : १३/०५/२०२५
**टिप :** ज्या सभासदांचे पत्ते बदलेले असतील त्यांनी त्यांचा नवीन पत्ता संस्थेच्या कार्यालयास अर्जाद्वारे कळविण्यात यावा.

# बिर्याणीच्या स्टॉलला संताचे नाव भाजपा आमदार आचार्य संतापले




■ जयपूर

**नेहमी** या ना त्या कारणाने चर्चेत राहणारे राजस्थानमधील भाजपा आमदार बालमुकुंद आचार्य यांचा एक व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. या व्हिडिओमध्ये एका शाकाहारी बिर्याणी विक्री करणाऱ्या स्टॉलला शाम बाबा या संताचे नाव दिल्यावरून आचार्य संतापल्याचे दिसत आहे.

या स्टॉलवर जय श्री शाम असे नाव लिहिलेले आमदार आचार्य यांनी पाहिले आणि ते आपल्या गाडीतून उतरून त्या स्टॉलजवळ गेले. हे मुघलांचे अन्न आहे. शाम बाबा हे सनातनचे संत आहेत. त्यांचे नाव बिर्याणीच्या स्टॉलला का दिले,अशा शब्दात त्यांनी स्टॉल मालकाला दम दिला.तसेच हे नाव तत्काळ हटवण्यास सांगितले. हा व्हिडिओ स्वतः आमदार बालमुकुंद आचार्य यांनी सोशल मीडियावर शेअर केला आहे.

**फॉर्म क्र.आयएनसी-२५ए**
**सार्वजनिक कंपनीचे खाजगी कंपनीत रूपांतर करण्यासाठी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिद्धी**

**क्षेत्रिय संचालक, सहकार मंत्रालय पश्चिम प्रदेश, मुंबई यांच्यासमक्ष**
**कंपनी कायदा २०१३, कंपनी कायदा २०१३ च्या कलम १४ आणि कंपनी (निगमन) नियम, २०१४ च्या नियम ४१ च्या बाबतीत**
**आणि**
**हॅरिसन्स स्टील लिमिटेड, सीआयएन U27100MH1999PLC122789 असलेले, त्यांचे नोंदणीकृत कार्यालय प्लॉट क्र.१, गट क्र.१९४ (भाग) नेहरोली गाव, तालुका वाडा, जिल्हा. ठाणे, ठाणे, महाराष्ट्र, भारत, ४२१३१२ च्या बाबतीत. .... अर्जदार**

सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येते की, कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १४ सहवाचिता वरील नियम अंतर्गत केंद्र सरकार/क्षेत्रिय संचालकांकडे अर्ज करण्याचा विचार करत आहे आणि **सोमवार २१ एप्रिल २०२५** रोजी झालेल्या अतिरिक्त सर्वसाधारण सभेत मंजूर झालेल्या विशेष ठरावाच्या अनुषंगाने कंपनीला खाजगी मर्यादित कंपनीत रूपांतरित करण्याची इच्छा आहे जेणे करून कंपनी अशा रूपांतरणाची अंमलबजावणी करू शकेल.

कंपनीच्या प्रस्तावित बदल/स्थितीमुळे ज्या व्यक्तीचे हित प्रभावित होण्याची शक्यता आहे, त्यांनी त्यांच्या हिताचे स्वरूप व विरोधाचे कारण नमूद केलेल्या प्रतिज्ञापत्राद्वारे त्यांचे आक्षेप रजि. पोस्टाने सदर सूचना प्रकाशन तारखेपासून १४ दिवसांच्या आत क्षेत्रिय संचालक, एव्हरेस्ट इमारत, ५वा मजला, मरीन ड्राईव्ह, मुंबई, महाराष्ट्र-४००००२ येथे पाठवावी तसेच एक प्रत याचिकाकर्ता कंपनीला त्यांच्या खाली नमुद नोंदणीकृत कार्यालयात पाठवावे.

**मंडळाच्या आदेशान्वये**
**हॅरिसन्स स्टील लिमिटेडकरिता**
**दौलत हरिराम फुलवाध्या**
**व्यवस्थापकीय संचालक**
**डीआयएन: ०२४४०८६१**
**दिनांक: १३.०५.२०२५**
**नोंदणीकृत कार्यालय:**
प्लॉट क्र.१, गट क्र.१९४ (भाग) नेहरोली गाव, तालुका वाडा, जिल्हा. ठाणे, ठाणे, महाराष्ट्र, भारत, ४२१३१२.

# पुन्हा शिवाजी साटम



गेल्या काही महिन्यांपासून 'सीआयडी' ही टीव्ही मालिका चर्चेचा विषय बनली होती. या मालिकेच्या सादरकर्त्यांनी एका ट्विस्ट आणत एका एपिसोडमध्ये बॉम्ब ब्लास्टमध्ये एसीपी प्रद्युमनचा प्रवास थांबवला होता व नवे एसीपी आयुष्यानची शोमध्ये एन्ट्री झाली होती. परंतु हा ट्विस्ट प्रेक्षकांना अजिबात आवडला नव्हता. आता आयुष्मानची भूमिका करणाऱ्या पार्थ समथानने सांगितले आहे की, 'सीआयडी'मध्ये मी पाहुणा कलाकार म्हणून काम करत होतो. आता या मालिकेमध्ये पुन्हा प्रद्युमनची भूमिका करणारे शिवाजी साटम रिएन्ट्री करत असून माझी भूमिका संपली आहे. पार्थने हे देखील सांगितले की, 'सीआयडी'सारख्या लोकप्रिय मालिकेशी जोडला गेल्याचा मला आनंद आहे.

## ही हॉरर सीरिज बघायला पाहिजे धाडस


हॉरर–सस्पेन्स सीरिजचे असंख्य प्रेक्षक आहेत. अशीच एक भीतीदायक, रहस्यमय व थ्रिलर सीरिज आहे, जिचे नाव आहे 'फ्रॉम'. या सीरिजचे दिग्दर्शक आहेत जॉन ग्रिफिन. अमेरिकन सायन्स–फिक्शन हॉरर जॉनर असलेल्या या सीरिजचे आतापर्यंत तीन सीझन प्रदर्शित झाले असून तीनही सीझन लोकप्रिय झाले आहेत. सुरुवातीला कदाचित या सीरिजच्या कथानकाची गती प्रेक्षकांना संथ वाटू शकते. परंतु जसजशी कथा पुढे सरकते, अचानक एक वेगळी कलाटणी घेते. प्रेक्षकांना काही वेगळे आणि भीतीदायक सस्पेन्स थ्रिलर पहायचे असेल तर ही सीरिज नक्की बघा. या सीरिजला आयएमडीबीवर ७.८ रेटिंग मिळाले आहे. 'फ्रॉम'चे पार्श्वसंगीत, त्यातील व्यक्तिरेखा आणि घाबरवणारी वातावरण निर्मिती थ्रिलर सीरिज आवडणाऱ्या प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करेल. 'फ्रॉम'चे कथानक एका अशा शहराभोवती फिरते, ज्यामध्ये लोक अडकतात व त्यांना बाहेर जाण्याचा मार्ग मिळत नाही.

## करीनाची पोस्ट



अभिनेत्री करीना कपूरने केलेली एक पोस्ट खूप व्हायरल होत आहे. करीनाची पर्सनल मॅनेजर पूनम दमानिया करीनाच्या शूटिंग, डबिंगच्या तारखा, मिटींग्स आधी सर्व गोष्टी सांभाळत असते. तर या पूनमचा काल वाढदिवस होता. त्यानिमित्ताने करीनाने न चुकता आपल्या सोशल मीडियावर शुभेच्छा देणारी एक पोस्ट शेअर करत पूनमविषयी प्रेम आणि आदर व्यक्त केला आहे. तिने अनेक फोटो शेअर केले आहेत, ज्यामध्ये तिच्यासह पूनम दिसत आहे. आपल्या पोस्टमध्ये करीनाने लिहिले आहे की, 'जिब्राल्टरच्या या माझ्या खडकाला आयुष्यातील या महत्वाच्या दिवशी तुला खूप खूप शुभेच्छा. आपला ९ वाजताचा फोन कॉल नेहमीच होऊ शकतो. 'माझ्यासह इतके वर्ष काम करत असल्याबद्दल धन्यवाद.' करीनाच्या या पोस्टवर तिची अभिनेत्री मैत्रीण मलायका अरोराने लिहिले आहे, 'जन्मदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा, पूनी.' करीनाची ही पोस्ट तिच्या चाहत्यांना व युजर्सना आवडत असून तिच्यावर कौतुकांचा वर्षाव होत आहे.

## असली हिरो दक्षिणेत



'बेबी', 'हाऊसफुल' यासारखे चित्रपट दिग्दर्शित करणाऱ्या साजिद खानने नुकतेच एका मुलाखतीमध्ये सांगितले की, हिंदी चित्रपटसृष्टीमध्ये हिरो अशी काही गोष्ट आता शिल्लकच राहिलेली नाही. हल्ली चित्रपटात फक्त लीड असतात, अभिनेता नाहीत. त्याने हे देखील वक्तव्य केले की, हिरोची खरी परिभाषा दाक्षिणात्य चित्रपटांमध्ये आहे. चित्रपटामध्ये त्यांची एन्ट्री जबरदस्त पद्धतीने केली जाते. समाजाला हानीकारक असणाऱ्या गोष्टी, त्यांच्याकडील चित्रपटांमध्ये दाखवल्या जात नाहीत. धर्मेंद्र, मिथुन चक्रवर्ती, अमिताभ बच्चन हे खरे हिरो होते, जे प्रेक्षकांना सिनेमागृहामध्ये खेचून आणत असत. आजकाल तर कुणीही हिरो बनत आहे.

# अथिया मदर्स डे



सुनील शेट्टीची अभिनेत्री मुलगी अथिया आणि तिचा पती के. एल. राहुल यांच्यासाठी ११ मे रोजी साजरा करण्यात आलेला मदर्स डे खास होता. कारण अथियाचा हा पहिलाच मदर्स डे होता. या खास दिवशी के. एल. राहुलने सोशल मीडियावर अथियासाठी एक खास पोस्ट शेअर केली आहे. त्या पोस्टमध्ये त्याने अथियाचा एक फोटो शेअर केला आहे, ज्यामध्ये अथियाने आपल्या मुलीला, इवाराला, कडेवर घेतले आहे. या फोटोमध्ये ब्लँकेटमध्ये लपेटलेल्या इवाराच्या डोक्याचा फक्त पाठचा भाग दिसत असून अथियाचा देखील अर्धाच चेहरा दिसतो आहे. फोटोसोबतच्या पोस्टमध्ये के. एल. राहुलने अथियाची मातृत्वाला स्वीकारण्याची ताकद, ग्रेस आणि धैर्य याचे कौतुक करत लिहिले आहे की, अथियाला या नव्या रुपामध्ये बघून तिच्याविषयीचे प्रेम द्विगुणित झाले आहे. आमची मुलगी इवारा खूप भाग्यवान आहे की, तिला अथियासारखी आई मिळाली आहे. अथिया आणि के. एल. राहुल जानेवारी २०२३ मध्ये विवाहबद्ध झाले होते व यावर्षी २४ मार्च रोजी अथियाने मुलीला जन्म दिला.

## अनुराग कश्यपने केली पोलखोल



**दिग्दर्शक अनुराग कश्यप नेहमीच आपल्या बेताल वागण्यामुळे आणि बोलण्यामुळे चर्चेत असतो. नुकतेच 'फुले' या चित्रपटाच्या प्रदर्शनादरम्यान ब्राम्हण समाजाविषयी त्याने अपशब्द वापरले होते आणि नंतर माफी मागितली होती. आता अनुरागने पॅन इंडिया चित्रपटांविरोधात वक्तव्य केले आहे व त्याचे हे वक्तव्य खूप व्हायरल होत आहे. एका इंग्रजी वृत्तपत्राला मुलाखत देताना अनुरागने सांगितले की पॅन–इंडिया हा माझ्यासाठी फार मोठा घोटाळा आहे. पॅन इंडिया हा एक मोठा शब्द आहे व एखादा सिनेमा तेव्हा पॅन इंडिया होतो, जेव्हा संपूर्ण भारतात तो यशस्वी होतो. त्यामुळे हा प्रश्न उपस्थित होतो की, कुठलाही सिनेमा प्रदर्शित होण्यापूर्वी पॅन इंडिया कसा काय बनतो?**

## जावेदनी शत्रुघ्नना का दिला नकार?



**गीतकार–चित्रपट** लेखक जावेद अख्तर १९६० च्या दशकामध्ये मुंबईत आले होते आणि चित्रपटसृष्टीमध्ये पाय रोवण्यासाठी अनेक काळ त्यांना मोठा संघर्ष करावा लागला होता. सुरुवातीच्या काळामध्ये दरमहा १२० रुपये भाडे असलेल्या एका लहान खोलीमध्ये ते राहत होते, ती खोली ते एक व्यक्तीसोबत शेअर करत असत. एका मुलाखतीमध्ये जावेद अख्तरनी अभिनेता शत्रुघ्न सिन्हा यांचा एक किस्सा सांगितला. जावेद अख्तरनी सांगितले की, मी ज्या भाड्याच्या खोलीत राहात होतो, त्याचे दरमहा मला ६० रुपये भाडे भरावे लागत असे. अशा स्थितीत एक दिवस अभिनेता शत्रुघ्न सिन्हा माझ्याकडे आला आणि म्हणाला की, मी देखील तुमच्यासह या खोलीमध्ये राहतो. तेव्हा मी त्याला म्हटलं की, तू वेडा आहेस का? मालकाला हे कळलं की मी आणखी एका माणसाला ही जागा वापरायला देतो आहे तर मला बाहेर फेकले जाईल. मी तुला या खोलीत ठेवू शकत नाही. दरमहा ६० रुपये तू कुठून आणशील? ते असतील तरच तुला इथे राहायला मिळेल.

## मला कधीच आवडणार नाही की...



**काही** काळापासून अभिनेत्री इलियाना डिक्रुझ आपला पती मायकल डोलनसह परदेशात राहते. २०२३ च्या ऑगस्टमध्ये तिने एका मुलाला जन्म दिला होता. आपल्या इंस्टाग्राम अकाऊंटवर एका चाहत्याच्या प्रश्नाला उत्तर देताना सांगितले की, आपल्या मुलाविषयी बोलताना सांगितले की, मला कधीच आवडणार नाही की, माझं प्रेम मिळवण्याठी माझ्या मुलांना माझ्यापाठी धावावे लागेल. माझं प्रेम मागायची वेळ कधीही त्यांच्यावर येणार नाही. मी स्वस्थ आणि आनंदाने मुलाचे संगोपन करते असेही तिने लिहिले आहे.



## हर्षवर्धन का चिडला आहे?



**पहलगाम** येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याचे उत्तर म्हणून भारताद्वारे पाकिस्तावर 'ऑपरेशन सिंदूर'द्वारे केलेल्या कारवाईनंतर भारतीय चित्रपटांमध्ये काम केलेल्या काही पाकिस्तानी कलाकारांनी भारताविरोधात वाट्टेल त्या पोस्ट केल्या आहेत. या पाकिस्तानी कलाकारांमध्ये आहे 'सनम तेरी कसम' या चित्रपटाची नायिका मावरा होकेन. भारताविरोधात पोस्ट लिहित तिने भारताला भ्याड म्हटले आहे. तिच्या या वक्तव्यावर चित्रपटाचा नायक हर्षवर्धन राणे खूप भडकला असून त्याने आपल्या सोशल मीडियावर लिहिले आहे की, प्रत्येक कलाकाराचा मी सन्मान करतो परंतु मावराच्या शब्दांमध्ये भारताविषयी किती तिरस्कार भरला आहे. हर्षवर्धन राणेने हे देखील सांगितले की, 'सनम तेरी कसम २' मध्ये ही पाकिस्तानी नायिका असेल तर मी या सिनेमामध्ये काम करणार नाही. दरम्यान या सिनेमाची निर्माता जोडी विनय सप्रू आणि राधिका राव यांनी देखील मावराच्या वक्तव्याचा धिक्कार केला आहे.

# अतिशय सर्वसामान्य आहे 'द रॉयल्स'

**'नादानियां', 'ज्वेल थीफ' आणि आता 'द रॉ' ही वेबसीरिज. बापरे बाप, 'नेटफ्लिक्स'ला झालंय तरी काय? कुठल्या गुणवत्तेच्या आधारे अशा प्रकारचे चित्रपट, सीरिज पास केल्या जातात, विकत घेतल्या जातात? 'द रॉयल्स' दिसायला एकदम चकचकीत आहे. सीरिजमध्ये काम केलेल्या मोठमोठ्या कलाकारांची भलीमोठी यादी आहे. परंतु चित्रपट–सीरिज यशस्वी होतात ते त्याची चांगली कथा–पटकथा आणि उत्तम दिग्दर्शनामुळे. तिथेच 'द रॉयल्स' फसली आहे.**

### कथानक

एका राजघराण्याची कथा आहे. राजस्थानच्या मोरपूरचे हे राजघराणे आहे. राजाचं निधन झाले आहे आणि इस्टेटीचे वाटप होत असते तेव्हा कळते की, इस्टेट म्हणून राजा आपल्या कुटुंबियांसाठी पैसे, महाल, दागिने नाही तर कर्ज सोडून गेला आहे. परंतु कुटुंबियांना तर पैसे पाहिजे. राजाच्या तीन मुलांपैकी अविराजच्या डोक्यावर मुकुट चढवला जातो. अविराजला घोड्यांविषयी खूप प्रेम आणि माणसांविषयी तिरस्कार आहे. प्रजेची दुःख ऐकायला त्याच्याकडे वेळ नाही. अशातच आपली नोकरी वाचवण्यासाठी एका स्टार्टअप कंपनीची सीईओ सोफिया शेखर, महालात सर्वसामान्य लोकांना राहायला दिले तर त्यांना राजघराण्याची माहिती होईल असा प्रस्ताव घेऊन अविराजला भेटते. महालाचे रुपांतर एका हॉटेलात करण्याच्या या प्रस्तावाला अविराज विरोध करतो, पण घराण्याला पैसे देखील हवे असतात, कर्ज देखील चुकवायचे असते. ही राजघराण्याची कथा असली तरी पूर्ण फोकस आहे तो अविराज–सोफियाच्या प्रेमसंबंधांवर. राजघराण्याची पार्श्वभूमी देण्याचा हास्यास्पद प्रयत्न करण्यात आला आहे. त्यातच अविराजशी लग्न करण्याची इच्छा असणाऱ्या आणखी एका तरुणीची एन्ट्री होते, ज्यामुळे प्रेमाचा त्रिकोण बनतो.

### कशी आहे सीरिज?

'द रॉयल्स' ची कथा लिहिली आहे नेहा वीना शर्माने तर ती दिग्दर्शित केली आहे प्रियंका घोष आणि नुपूर अस्थानाने. लेखिकेने आपल्या कथानकाने कदाचित तिने ओटीटी प्लॅटफॉर्मला खूश केले असले तरी या सीरिजमध्ये कुठेही भारतीयपणा आढळत नाही. एक तद्दन रद्दड सीरिज असेच म्हणायला हवे. हिंदी सिनेमांमध्ये अभिनेत्रींना शो पीस म्हणून दाखवले जाते. परंतु या सीरिजमध्ये इशान खट्टरला एक शो पीस म्हणून दाखवण्यात आले आहे. संपूर्ण सीरिजभर त्याने कितीवेळा आपला शर्ट उतरवला असेल, हे न मोजलेलेलच बरे. कल्चरच्या नावावर समलैंगिक संबंधाच्या आड मोठ्या प्रमाणावर इंटिमेट, बोल्ड दृश्यांचा भडीमार केला आहे. या सीरिजमध्ये कपडे अधिक उतरले आहेत की संवाद अधिक आहेत, बोल्ड सीनमध्ये कथानक आहे की, कथानकात बोल्ड सीन याविषयी




शंका निर्माण होते. ही एका कुटुंबाची, कौटुंबिक सीरिज आहे असे दाखवण्याचा प्रयत्न केला असला तरी प्रेक्षक ही सीरिज आपल्या कुटुंबासह पाहू शकणार नाहीत. सीरिजला आंतरराष्ट्रीय दर्जा देण्यासाठी यात इंग्रजी संगीत, गाणी, शेवटी काही सेलिब्रिटीचे आगमन तसेच इंग्रजी कलाकार आणले असले तरी ते देखील या सीरिजला वाचवू शकलेले नाहीत. या सीरिजचे ४०–५० मिनिटांचा एक एपिसोड असे आठ एपिसोड बघणे म्हणजे फार मोठी शिक्षा आहे. काहीतरी नवे घडेल, रंजक ट्रॅक सुरु होईल. कथेला कलाटणी मिळेल अशी आशा शेवटपर्यंत वाटत राहते परंतु कथानकात बघण्यासारखे काहीच घडत नाही. नाही म्हणायला नेटफ्लिक्सने सेटवर सीरिजच्या लूकवर खूप खर्च केला आहे. त्यामुळे सीरिज चकचकीत दिसते.

### अभिनय

कुठल्याही कलाकाराचा अभिनय प्रभावी आहे असे म्हणता येणार नाही. झीनत अमान, साक्षी तन्वीर, मनोज पाहवा सारख्या कलाकारांना जबरदस्तीने ओव्हर ॲक्टिंग करायला लावली आहे. इशान खट्टर कुठल्याही अँगलने राजपुत्र दिसत नाही. चित्रपटसृष्टीतील अन्य अभिनेत्री आपला अभिनय ग्राफ उंच करायचा प्रयत्न करत आहेत, भूमी पेडणेकर आपला अभिनय ग्राफ खाली नेत चालली आहे, हे या सीरिजद्वारे किंवा तिच्या नुकत्याच येऊन गेलेल्या 'मेरे हजबंड की बीवी' या सिनेमाद्वारे लक्षात येत आहे. एक तर अति बारीक होण्याच्या नादात भूमी खप्पड आणि वयस्कर दिसू लागली आहे. तिच्यापेक्षा झीनत अमान देखील ग्रेसफूल दिसतात. अभिनयाच्या बाबतीत एकाच कलाकाराचे नाव घेता येईल ते म्हणजे विहान समात. तो राजघराण्यातील शोभला देखील आहे आणि त्याचा अभिनय देखील चांगला आहे. चंकी पांडे ठीकठाक. नोरा फतेहीची निवड चुकीची केली आहे.

**वेब सीरिजः** द रॉयल्स
**निर्माताः** प्रीतीश नंदी
**दिग्दर्शकः** प्रियंका घोष आणि नुपूर अस्थाना
**लेखकः** नेहा वीना शर्मा, हर्ष व अनुकंपा
**कलाकारः** झीनत अमान, भूमी पेडणेकर, इशान खट्टर, साक्षी तन्वर, नोरा फतेही, विहान समात, मिलिंद सोमण, लिसा मिश्रा आणि सुमुखी सुरेश
**रेटिंगः** ✱ / ५

# नवाकाळ शब्दकोडे-१२५०



**आडवे शब्द –**

२. धुमाकूळ ५. व्रताची सांगता ७. उपमर्द १०. नर्तकी, कलावंतीण १२. पडदा, हृदयातील झडप १३. नांगरणीचा प्राणी १४. लाडका शिष्य, कुस्तीगीर १५. खड्डा १७. गाढ झोप २०. कठोर शब्दात कानउघाडणी २२. भ्रमर, भुंगा २४. कोल्हापुरी दागिना २६. धनुष्य, स्त्रियांचा नथीचा चिमटा २८. भांडकुदळ स्त्री २९. रेशमी शालीचा प्रकार ३२. प्रसन्न चेहऱ्याचा ३५. योगासनाचा एक प्रकार ३६. दागिने गाठवण्याचे काम करणारा ३९. देवाच्या मूर्तीभोवतीची सजावट ४०. अस्थी ४१. काळजीत पडलेला ४३. सळईवर भाजलेले लुसलुशीत पदार्थ ४४. तिरसट, खडूस ४५. ज्वर ४६. दशरथाचे वडील, रामाचे आजोबा ४८. बाजू, कैवार ५०. दहशत ५२. तात्पर्य ५३. परंपरावादी ५६. मनोहर ५७. तुळईवर आडवा टाकलेला खांब ५९. हळू ६१. कमी, उणे ६२. चंद्र, मुलींचे एक नाव ६३. पाठीचा कणा ६४. पौर्णिमा ६५. नालस्ती ६७. प्रशंसा ६८. उन्मत्तपणा ६९. अंगरखा ७१. उपवासाला चालणारा गोडसर कंद ७३. अति कृपण, खाष्ट ७५. सत्ताविसावे नक्षत्र ७८. पसरट टोपली ८२. बकबक ८४. प्राण नेणारा देव ८६. राजाची आई ८८. मदिरा ८९. कचरा, अडगळीची जागा ९०. वडील, जनक ९१. पाषाण ९२. लगेच ९४. पवित्र ९५. अफवा ९६. वरच्या दर्जाचा, उत्कृष्ट ९७. वचक, दरारा ९८. रजई ९९. बारीक तुकडा, अंश १००. मनापासून १०१. कार्य, कष्ट १०३. कंबरडे १०४. चपाती १०५. दगाबाजी, गद्दारी १०७. आच्छादन, आवरण १०८. ऐट, बडदास्त १०९. मोठा हातोडा ११०. शेराचा आठवा भाग

**उभे शब्द –**

१. अलेक्झांडरचे भारतातले नाव २. शेकोटी ३. मनातील गोष्ट ४. नवऱ्याची दुसरी बायको ५. उन्हाळ्याचा त्रास ६. कांदा ७. नाथपंथीयांचा मंत्र- xxx निरंजन ८. मर्कट ९. जिलेबीबरोबरचे ताक ११. ओरखडा १४. अड्डल, कसबी १६. मिठी १८. देश १९. पृथ्वी २१. स्वभाव किंवा व्यक्तिमत्त्व ठरवणारे तीन गुण २२. तोरा २३. उत्साह २५. विषारी २७. उपरती, पस्तावा २८. दरवाजा २९. हित चिंतणारा ३०. देखणेपण, सौंदर्य ३१. कपटी, कुटील ३३. चेहरा, गाण्याची पहिली ओळ ३४. गाढव ३५. भरवशाचा आव आणणारा ३७. एकाग्र दृष्टी ३८. थडगे ४२. होडी ४५. चांदणी ४६. धाकटी बहीण४७. विश्व ४९. लादी ५१. शक्तिशाली, आडदांड ५२. कर्ज देणारा, धनको ५४. खिडकीची काच ५५. पेच ५८. ढगांची गर्जना ५९. सगळा ६०. कोवळा नारळ ६२. रोमांच ६३. टेबल ६६. देवांचा राजा ६८. मृत्तिका ७०. रक्ताचा रंग ७२. ज्यूटचे कापड ७४. ज्वर मोजण्याचे उपकरण ७६. मिठाईवरचा पातळ चंदेरी लेप ७७. बटवडा, वितरण ७९. कवितेतली अंतर्गत लय ८०. गोखरू, गोक्षुर वनस्पती ८१. विनोबांनी केलेला यज्ञ ८२. आश्वासन ८३. पायपीट ८५. खतम ८७. जेवणाची थाळी ८९. गायक ९०. आजोबा ९१. पावसाची हलकी सर ९३. कान ९४. बदल ९६. सदस्य, मेंबर ९७. घर ९८. किरकोळ खरेदीचे ठिकाण ९९. कलिका १०१. समय १०२. आघात, प्रहार १०३. आळी, मोहल्ला १०४. उदर १०५. पत्रावळीवरची वाटी १०६. दया, कणव •

**नवाकाळ कोडे क्रमांक १२४९चे उत्तर**

**आडवे शब्द** : १. जाज्वल्य ३. काकवी ६. बेजबाबदार ११. भडंग १३. माल १५. रंजक १७. वगर १८. मासला २०. तन २१. धिप्पाड २२. ढगाळ २३. डबा २५. मवसर २६. कमाई २८. पाक ३०. राम ३२. बालमखिरा ३४. आसपास ३५. नल ३७. श्रम ३९. खत ४०. गुडदाणी ४२. तमोहर ४३. रडार ४४. हुद्दा ४५. दबाव ४७. हर ४८. झरणी ४९. आयतन ५१. अट ५२. लीलावती ५५. तुरा ५६. पिनकोड ५७. दुपट्टा ५८. मत ५९. शल्य ६०. अवसान ६२. कपट ६४. हानी ६५. पणन ६६. कबर ६७. हाट ६९. गप्पीदास ७२. खण ७३. उलगडा ७६. हवालदिल ७९. खोट ८०. रसाळ ८१. खडाजंगी ८३. सत्यवती ८५. पर्यटक ८७. परळ ८८. करणी ९०. कटकट ९२. चुट्टा ८३. गावकरी ९६. वार ९७. हलकारा १००. शीलवान १०१. हयगय १०३. चतुरानन १०६. रत्तल १०७. आयता १०८. रीठ १०९. क्षीण

**उभे शब्द** : १. जामात २. ज्वलनशील ४. करंडक ५. वीज ७. जवळपास ८. बाग ९. बरड १०. रमा ११. भलावण १२. गटार १४. विधिलिखित १६. कढई १९. सम २४. बारा २७. मार्तंड २९. कपाळ ३१. मनमोहन ३२. बाहेरख्याली ३३. मखर ३४. आणीबाणी ३६. लहर ३८. मनगट ४०. गुद्दा ४१. दादर ४४. हुक्की ४६. बायको ४८. झरा ४९. आनन ५०. तडक ५१. अट्टाहास ५३. लामणदिवा ५४. वतन ५५. तुल्यबळ ५६. पिसाट ५७. दुटप्पी ५९. शक ६१. वहाण ६३. पगडा ६८. जलसा ७०. दारुडा ७१. आदित्य ७२. खटपट ७३. उरक ७४. गळपट्टी ७५. रागी ७६. हस्तक ७७. लसणी ७८. लवकर ८१. खळगा ८२. जंबूक ८४. तीट ८६. टक्कल ८९. रगेल ९१. कषाय ९२. चुरा ९४. वजन ९५. रीघ ९६. वानर ९७. हय ९८. काषाय ९९. फितूरी १००. शीर्ष १०१. हल १०२. गर्ता १०४. राठ १०५. नक्षी

# सोनेबाजार आणि इक्विटीबाजार कसा राहील?

**सोन्यातील गुंतवणूक**

नवीन वर्षांत सोन्यात नव्याने गुंतवणूक करणार्यांनी नव्या कॅलेंडर वर्षांत सोन्याची वाटचाल कशी राहिल.

**एकीकडे सोन्याच्या भावाने उच्चांकी पातळी गाठलेली असताना दुसरीकडे शेअर बाजाराची भरारी पाहून गुंतवणूकदार गोंधळून गेले आहेत. शेअर बाजारात जावे की सोन्याकडे. अर्थात परतावा पाहिला तर दोन्ही क्षेत्राकडून गुंतवणुकदारांना चांगला परतावा मिळाला आहे. अशावेळी नवीन वर्ष काही दिवसांवर येऊन ठेपलेले असताना गुंतवणुकदार नवीन वर्षात गुंतवणुकीची नवी रणनीति आखत आहेत. अशावेळी कोणत्या क्षेत्राला झुकते माप द्यावे याचा विचार करणे स्वाभाविक आहे.**

याचा विचार करायला हवा. सध्याची स्थिती पाहिली तर शेअर बाजाराच्या तुलनेत सोन्यातील परतावा हा अधिक सुरक्षित आणि स्थिर म्हणता येईल. सोन्याने १९९० ते ऑक्टोबर २०२४ पर्यंत १०.६ टक्के कम्पाउंडिंग परतावा दिला असला तरी तो शेअर बाजाराच्या दीर्घकाळातील गुंतवणुकीच्या तुलनेत कमीच म्हणावा लागेल. अर्थात चालू कॅलेंडर वर्षात सोन्याची किमत अधिक राहू शकते आणि त्याचा फायदा कमी कालावधीतील गुंतवणूकदारांना मिळाला आहे. चालू कॅलेंडर वर्षांत सोन्याच्या भावात जसजशी वाढ झाली तसतसा सहा महिने आणि वर्षभरासाठी गुंतवणूक करणार्यांनी त्याचा फायदा उचलला. सोन्याचे भाव कमी होताच, त्याची खरेदी केली जाते आणि वाढ होताच नफावसुली केली जाते. हा ट्रेंड अर्थातच चांगला नाही. ज्यांना परतावा आणि चढउतार यात संतुलन हवे आहे, अशा गुंतवणुकदारांसाठी सोन्यातील गुंतवणूक सुरक्षित राहू शकते. नफेखारी करणार्यांनाही गुंतवणुकीचा हा चांगला पर्याय राहू शकतो. जगातील प्रमुख रेटिंग आणि रिसर्च एजन्सी गोल्डमन सॅक्सच्या मते, २०२५ मध्ये सोन्याची किंमत विक्रमी पातळीवर पोचू शकते. गोल्डमनचा अहवाल पाहिला तर कमी कालावधीसाठी गुंतवणुकदारांचा कल हा सोन्याकडे झुकू शकतो आणि परिणामी किंमतीत आणखी वाढ होऊ शकते. कोटक सिक्युरिटीजच्या एका अहवालानुसार, नव्या वर्षात देखील सोन्याला मागणी राहील, असे चित्र आहे. गोल्ड इटिएफचा विचार केला तर मावळत्या वर्षात गोल्ड ईटीएफमधील गुंतवणुक ही तीन पटीने वाढलेली दिसते. गेल्या वर्षीच्या ३३३.३७ कोटी रुपयांच्या तुलनेत वाढून ती १२५६ कोटी रुपयांवर पोचली आहे. आपण २०२४ मधील परतावा आणि सध्याच्या स्थितीचा विचार केला तर नव्या वर्षात तीस टक्के किंमत अपेक्षित आहे. म्हणजे जानेवारीत सोने खरेदी केले तर वर्षाच्या अखेरीस त्याची किंमत ३० टक्क्यांनी वाढलेली असेल.

**इक्विटी बाजाराची स्थिती**

यावर्षी शेअर बाजारात चांगली तेजी पाहवयास मिळाली. निर्देशांकाने नवीन विक्रम नोंदवला तर कधी कोलांडउडी देखील मारली. यावर्षी प्रारभी बीएसई निर्देशांक सुमारे बारा हजारांनी वाढलेला दिसतो आणि त्याचबरोबर गुंतवणुकदारांना सुमारे १६ टक्क्यांनी परतावा देखील दिला. गेल्यावर्षी गुंतवणुकदारांना सुमारे १८ टक्के परतावा मिळाला होता. २०२४ मध्ये सोन्याने विक्रमी पातळी गाठली असली तरी शेअर बाजाराने देखील गुंतवणूकदारांना निराश केलेले नाही. यावर्षी गुंतवणुकदारांनी जबरदस्त कमाई करत सुमारे ११०.५७ लाख कोटी रुपयांचा एकूण परतावा मिळवला आहे. अर्थात दीर्घकाळात शेअर बाजारातील परतावा कमी होतो. शेअर बाजारात मिड कॅप आणि स्मॉलकॅप देखील मागे राहिलेले नाही. या काळात दोन्ही क्षेत्रातील गुंतवणुकदारांना सुमारे ३४ ते ३५ टक्के परतावा मिळाला आहे. तज्ज्ञांच्या मते, शेअर बाजाराचा ट्रेंड हा नव्या वर्षांतही कायम राहू शकतो. बाजाराचा अभ्यास करणार्या 'जेफरीज'च्या एका अहवालानुसार भारतीय अर्थव्यवस्था चांगल्या रितीने वाटचाल करेल आणि त्यामुळे गुंतवणुकीचा ओघ वाढेल. साहजिकच त्याचा परिणाम भारतीय शेअर बाजारावर दिसेल आणि परिणामी शेअर बाजार २०२५ मध्ये चांगली कामगिरी करू शकतो. सांगायचे तात्पर्य की एकाच क्षेत्रात सर्व गुंतवणूक करण्यापेक्षा दोन्ही क्षेत्रात थोडीथोडी गुंतवणूक करत पोर्टफोलिओत वैविध्यपणा आणावा. तसेच गुंतवणूक सोन्याची किंवा शेअर बाजारातील असो, गुंतवणूकदारांनी आर्थिक सल्लागारांशी चर्चा करूनच त्याचा निर्णय घेतला पाहिजे.






# नागपूरच्या उमरेड तालुक्यातील खाणीत ५ जणांचे मृतदेह आढळल्याने खळबळ

■ नागपूर

नागपूरमध्ये पाण्याने भरलेल्या खाणीत ५ जणांचे मृतदेह आढळल्याने एकच खळबळ उडाली.या मृतांमध्ये एक पुरुष, दोन महिला आणि दोन किशोरवयीन मुलांचा समावेश आहे. नागपूर जिल्ह्याच्या उमरेड तालुक्यात सुरगाव शिवारात ही घटना घडली. रोशनी चंद्रकांत चौधरी (३२),तिचा मुलगा मोहित चंद्रकांत चौधरी (१२),मुलगी लक्ष्मी चंद्रकांत चौधरी (१०),बहीण रज्जो राऊत (२५)आणि इतिराज अन्सारी (२०)अशी मृतांची नावे आहे. हे पाचही जण रविवार असल्याने त्या भागात फिरण्यासाठी आले होते.पण पाचही जण रात्र झाली तरी घरी परतले नव्हते. त्यामुळे कुटुंबीयांनी बेपत्ता असल्याची तक्रार नागपूर येथील दोन पोलीस स्टेशन अंतर्गत नोंदवली होती. या घटनेची माहिती मिळताच नागपूर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि बचाव पथकाच्या मदतीने नागपूर पोलिसांनी पाचही जणांचे मृतदेह बाहेर काढले.हे पाचही जण एकाच कुटुंबातील आहेत. ही दुर्घटना आहे की सामूहिक आत्महत्या हे अद्याप स्पष्ट नाही. नागपूर पोलिस पुढील तपास करत आहेत.

# भाजपाची देशभर तिरंगा यात्रा

■ नवी दिल्ली

भाजपा देशभरात १३ मे ते २३ मे या कालावधीत तिरंगा यात्रा काढणार आहे. ही १० दिवसांची यात्रा देशाच्या विविध भागांतून काढली जाणार असून, भाजपाचे नेते आणि मंत्री तिचे नेतृत्व करणार आहेत. या यात्रेच्या माध्यमातून केंद्र सरकारच्या ऑपरेशन सिंदूर या यशस्वी मोहिमेची माहिती जनतेपर्यंत पोहोचवली जाणार आहे.

# पवार काका-पुतणे पुन्हा एकत्र पुण्यातील कार्यक्रमात उपस्थिती

पान १ वरून

दोघांच्या मध्ये शरद पवार यांची खुर्ची होती. यावेळी शरद पवार यांच्या कानात काहीतरी कुजबुजले. त्यानंतर त्यांच्यात काही क्षण बोलणेही झाले.

कार्यक्रम झाल्यानंतर मात्र शरद पवारांनी या विषयी काही बोलले नाहीत. ते म्हणाले की, महाराष्ट्रातील सहकारी कारखाने सुरवातीला ८० टक्के सहकारी आणि २० टक्के खासगी होते. परंतु आता ५० टक्के कारखान्यांची संख्या वाढली आहे. त्यामुळे मुख्यमंत्री फडणवीस यांना सहकारी संस्थाचा अभ्यास करण्यासाठी समितीची स्थापना करावी.

तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, सहकारी उद्योग आता केवळ साखर कारखाना चालवू शकणार नाहीत. आता त्यांना इतर संबंधित व्यवसायही करावे लागणार आहेत. याठिकाणी व्यावसायिक कामाऐवजी खोगीर भरती अधिक होते. देशात नरेंद्र मोदी यांचे सरकारच्या काळात पहिल्यांदाच सहकार विभागाचे मंत्रालय स्थापन झाले. अमित शहा यांच्या नेतृत्वातील या मंत्रालयाच्या कारभारामुळे या क्षेत्रात आपण प्रगती करत आहोत. याशिवाय शरद पवार यांच्या मागणीप्रमाणे सहकारी साखर कारखान्यासाठी एक समिती स्थापन करून त्याचा अभ्यास करू.

तर उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, सहकार क्षेत्रामध्ये अमुलाग्र बदल होत असताना संस्थेला नफा मिळाला तर त्यातून संचालक मंडळालाही काही मिळाले पाहिजे, अशी मागणी होते. मात्र संचालक बोर्डामुळे संस्था अडचणीत येत असेल तर त्यांच्याकडूनही नुकसान वसूल केले पाहिजे. सहकारी संचालक मंडळे सहकारी मंत्र्यांच्या पक्षाकडे जातात, ते बंद झाले पाहिजे. संचालकांनी सत्ताधारी पक्षांमध्ये येण्याचा प्रयत्न केला तर त्यांना थांबवले पाहिजे. तरच लोक सुतासारखे सरळ होतील.

# पद्मावती देवीच्या मूर्तीसाठी जैन मंदिरात जागा राखीव ठेवा

पान १ वरून

मागणी केली होती.

ट्रायल कोर्टने त्यांची ही मागणी फेटाळत असे निरीक्षण नोंदवले की देव सर्वव्यापी आहे आणि कोणत्याही ठिकाणी, गर्भगृहात (गर्भगृहात) किंवा मंदिरातील इतर कोणत्याही ठिकाणी, मूर्तीची प्रार्थना करता येते. त्यानंतर अजय जैन प्रकरण उच्च न्यायालयात पोहोचले. न्यायमूर्ती अनुप जयराम भांभानी यांच्यासमोर झालेल्या सुनावणीत त्यांनी, ज्या देवतेची मूर्ती ४० वर्षांहून अधिक काळ मंदिरात होती, तिच्या हक्कांवर निर्णय न घेता खटला फेटाळून लावण्याचा ट्रायल कोर्टाच्या अनुचित दृष्टिकोनावर आक्षेप घेतला. श्रद्धेच्या बाबींचा अशा प्रकारे तिरस्कार करता येणार नाही, असे म्हणत न्यायालयाने ट्रस्टला मूर्तीसाठी नियुक्त केलेली जागा रिकामी ठेवण्याचे निर्देश देणारा अंतरिम आदेश पारित केला. मूर्ती ज्या खोलीत ठेवली आहे त्या खोलीत तिच्यासाठी सर्व विधी पार पाडले जातील, याचीही हमी न्यायालयाने घेतली. या प्रकरणाची पुढील सुनावणी २८ ऑगस्ट रोजी होणार आहे.

# आम्ही अजूनही सज्ज! कारवाईस कधीही तयार एकत्र ताकद लावू! तिन्ही सैन्यदलांचा इशारा

पान १ वरून

रडार, हवाई संरक्षण प्रणाली, जुन्या हवाई संरक्षण प्रणाली आणि आधुनिक हवाई संरक्षण प्रणालींचे थर होते. त्यात रडार, मानवरहीत हवाई यंत्रणा, शोल्डर फायर्ड शस्त्रे, विंटेज एअर डिफेन्स आणि शेवटी अत्याधुनिक एअर डिफेन्स सिस्टम यांचा समावेश होता. त्यामुळे पाकिस्तानला ही अनेक स्तरांची सुरक्षा व्यवस्था पार करून आपल्या हवाई तळांवर हल्ला करण्याची संधीच नव्हती. ही अनेक थरांची एअर सिस्टम ओलांडून हल्ला करणे कठीण होते. यातील एखादा हा थर ओलांडला तरी, आमच्या ठिकाणांवर आदळण्यापूर्वीच कुठली ना कुठली यंत्रणा त्यांच्या हवाई अस्त्राला खाली पाडणार होती. यांच्या जोडीला सीमा सुरक्षा दलही तैनात होते. त्यांच्या महासंचालकांपासून ते चौकीचे रक्षण करणाऱ्या सैनिकांपर्यंत सगळे यात सहभागी होते. ऑपरेशन सिंदूर आणि नंतरही तिन्ही सैन्य दले एकत्र काम करत होती. शिवाय १४० कोटी भारतीय आमच्या मागे उभे होते. यासाठी आम्ही त्यांना सलाम करतो. पाकिस्तानला आम्ही कारवाईतून जबर इशारा दिला आहे. समझने वालों को इशारा काफी होता है, असे आम्हाला वाटते. एअर मार्शल ए. के. भारती म्हणाले की, पाकिस्तानवर हल्ला केला, त्यावेळी आपल्या सगळ्या यंत्रणा एकाच वेळी सक्रिय करण्यात आल्या होत्या. जुनी हवाई संरक्षण प्रणाली देखील योग्यरित्या काम करत होती. तर नवीन प्रकारच्या आकाश प्रणालीद्वारेही हल्ल्यांना प्रत्युत्तर देण्यात आले. पाकिस्तानने चिनी बनावटीची क्षेपणास्त्रे होती. लांब पल्ल्याच्या रॉकेट, यूएव्ही, कॉडक्राफ्टसह तुर्की बनावटीच्या ड्रोन यांच्याद्वारे हल्ला केला. आमच्या हवाई संरक्षण यंत्रणेने त्यांना पाडले. याऊलट आम्ही त्यांच्या नूर खान एअरबेसवर हल्ला केला. रहीम यार धावपट्टी उद्ध्वस्त केली. त्यांची रडार सिस्टम नष्ट केली.

व्हाइस ॲडमिरल ए.एन प्रमोद म्हणाले की, 'नौदलानेही पाळत ठेवण्याचे काम अचूक केले. आम्ही अनेक सेन्सर्स आणि इनपुट दिले. आम्ही अनेक धोक्यांची ओळख पटवून त्यांची आधीच कल्पना दिली. ड्रोन, हाय-स्पीड क्षेपणास्त्रे आणि विमानांची माहिती प्रगत रडारच्या मदतीने देण्यात आली. विमानवाहू जहाजांवरील मिग-२९ विमानेही सज्ज होती. आमचे वैमानिक रात्रंदिवस काम करण्यास सज्ज होते. आजही नौदल तेवढेच सज्ज आहे.

आजच्या पत्रकार परिषदेची सुरुवात राम धारी दिनकर यांच्या याचना नहीं अब रण होगा, जीवन जय मरण होगा या गीताने झाली. यावेळी भारताच्या कारवाईचे अनेक फोटोही दाखवण्यात आले.

